रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३०४
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शनिवार, २३ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भारताच्या अंतराळ भरारीला जागतिक सलाम



**नवी दिल्ली :** भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३च्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग करून इतिहास रचणाऱ्या भारताला आता अमेरिकेतील प्रतिष्ठित '२०२६ गॉडार्ड अ‍ॅस्ट्रोनॉटिक्स अ‍ॅवॉर्ड'ने गौरवण्यात आले आहे. 'अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ एरोनॉटिक्स अँड अ‍ॅस्ट्रोनॉटिक्स'ने दिलेला हा सन्मान संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहचणारा भारत जगातील पहिला देश ठरला होता. याची दखल आता जागतिक स्तरावर घेतली गेली. इस्रोच्या शास्त्रज्ञांच्या परिश्रमाला हा पुरस्कार सर्वात मोठी पावती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिजनरी नेतृत्वात 'नवा भारत' मोठी स्वप्ने पाहत असून ती प्रत्यक्षात उतरवत आहे. भारताच्या या अंतराळ झेपेने जगाला नव्या युगाची चाहूल लागली आहे.

अंतरंग

पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध- मंत्री छगन भुजबळ/२

बेलापूर ओएनजीसी वसाहतींची दुरवस्था/६

गुजरातचा दमदार विजय; टॉप २मध्ये स्थान निश्चित/८

# एआय क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

## 'मुंबई टेक वीक'ची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता एआय हे भविष्यातील परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात एआय स्वीकारण्याची आवश्यकता आहे. मुंबई टेक वीकसारख्या उपक्रमांमुळे एआयमधील संधी युवकांपर्यंत पोहचतील आणि महाराष्ट्र देशातील एआय नवोन्मेषाचे अग्रगण्य केंद्र बनेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २२) येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मुंबई टेक वीक २०२६ ची घोषणा सह्याद्री अतिथिगृहात केली, त्यावेळी ते बोलत होते. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम) तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा



कार्यक्रम दि. २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे. "इंडिया : आय इन एक्शन" या थीमअंतर्गत आयोजित मुंबई टेक वीक २०२६मध्ये विविध क्षेत्रांतील एआयच्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण होणार असून मेटा, एंथ्रॉपिक, ओपेनाई, गुगल क्लाउड आणि नेसा यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल. यावेळी मुंबई टेक वीक लोगोचे अनावरण करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासन एआयचा विविध विभागांमध्ये वापर करीत आहे. एआयच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक होत आहे. शासन या परिवर्तनात सर्वात मोठा भागधारक म्हणून सक्रिय भूमिका बजावत आहे. मुंबई टेक वीकसारख्या व्यासपीठांमुळे एआयसंदर्भातील अनुभव लोकांपर्यंत अधिक व्यापक पातळीवर पोहचतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी या कार्यक्रमात शासनाच्या एआय उपक्रमांचे अनुभवात्मक सादरीकरण करण्याची सूचनाही केली. टीमच्या वाढत्या विस्ताराचे कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अधिकाधिक तरुण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक या उपक्रमाशी जोडले जात आहेत ही सकारात्मक बाब आहे. महाराष्ट्र शासन एआय क्षेत्रातील नवोन्मेष आणि उद्योगवृद्धीसाठी सदैव तुमच्या पाठीशी उभे आहे. गेल्या वर्षापेक्षा अधिक भव्य आणि प्रभावी मुंबई टेक वीक आयोजित करूया आणि महाराष्ट्रातील युवकांना एआय क्षेत्रातील नव्या संधींशी जोडून त्यांना जागतिक पातळीवरील संधी उपलब्ध असेल.

या वेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार (गुंतवणूक व धोरण) कौस्तुभ धवसे, टीम गव्हर्निंग कौन्सिलचे सहअध्यक्ष संस्थापक आक्रित वैश, टीम गव्हर्निंग कौन्सिलचे सहअध्यक्ष हर्ष जैन, संस्थापक प्रमुख, विपणन (मार्केटिंग), गव्हर्निंग कौन्सिल नैव्या साग्गी उपस्थित होते.

## राज्यात पूर्व मान्सूनचा जोर; उकाड्यापासून दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या काही भागात शुक्रवारी (दि. २२) पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांनाही दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत जोरदार पावसाने हजेरी लावली. पावसाने हजेरी लावल्यामुळे तापमानाचा पारा काही प्रमाणात कमी झाला होता.



पुण्यातील कोंढवा परिसरात ज्योती चौकात पावसानंतर रस्त्यावर पाणी भरले होते. नागरिकांना वाहने चालवताना त्रास झाला. या पावसामुळे वाहतूक संथ गतीने सुरू होती. काही दिवसांपासून पुणे शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याचे पाहायला मिळाले होते. सकाळपासून मात्र शहरात ढगाळ वातावरणामुळे दुपारी पावसाला सुरुवात झाली. शहरातील उपनगर तसेच मध्यवर्ती भागात पावसाच्या सरी बरसल्या.

मुंबईकर आतुरतेने मान्सूनच्या आगमनाची वाट पाहत होते. शुक्रवारी सकाळी मान्सूनपूर्व पावासाला सुरूवात झाल्यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण झाले होते. हलक्या सरी का होईना पण या पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास अंधारमय वातावरण झाले होते. तुफान पाऊसही सुरू झाला. गेल्या दोन दिवसांपासून भरदुपारी ढग दाटून येत होते, मात्र पाऊस हुलकावणी देत होता. शुक्रवारी मात्र ढग इतके दाटून आले की अंधारमय वातावरणही झाले आणि पाऊसही कोसळला.

रत्नागिरीतही पावसाने हजेरी लावली. चिपळूणमध्ये मान्सूनपूर्व सरी बरसल्या. विजांच्या कडकडाटसह चिपळूणमध्ये पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उन्हाच्या तीव्रतेने हैराण झालेल्या नागरिकांना उकड्यापासून दिलासा मिळाला आहे. चिपळूणसह खेड, गुहागरमध्येही काही भागात पावसाच्या सरी बरसल्या.

### रायगड जिल्ह्यात पावसाची हजेरी

रायगडमध्येही अखेर अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. रायगडमधील दक्षिण भागात माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन परिसरात पावसाच्या सरी कोसळल्या. हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलेला अंदाज खरा ठरला आहे. प्रवासी आणि नागरिकांची तारांबळ उडाली होती. दक्षिण रायगडनंतर उत्तर भागातील खालापूर, खोपोली, कर्जत परिसरातदेखील पावसाची तुफान बॅटिंग सुरू होती. खोपोली परिसरातील बोरघाट, मुंबई-पुणे जुना हायवे, एक्स्प्रेस वेसह ग्रामीण भागातदेखील पावसाने दमदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली होती.

## दबा धरून बसलेल्या वाघिणीचा १३ जणांवर हल्ला

### चार महिलांचा जागीच मृत्यू

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

मानव-वन्यजीव संघर्षाची एक अत्यंत हृदयद्रावक आणि अंगावर काटा आणणारी घटना चंद्रपूर जिल्ह्यातून उघडकीस आली आहे. सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही-पवनपार जंगल परिसरात एका मादी वाघाने केलेल्या भीषण हल्ल्यात चार निष्पाप महिलांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. एकाच हल्ल्यात तब्बल चार जणांचा बळी जाण्याची राज्यातील ही पहिलीच घटना मानली जात आहे. या भयंकर प्रसंगामुळे संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कविता मोहुर्ले (४५ वर्षे), अनिता मोहुर्ले (४६), संगीता चौधरी (४०) आणि सुनीता मोहुर्ले (३५) अशी हल्ल्यात मृत्यू झालेल्या महिलांची नावे आहेत. या सर्व महिला खैरीचकजवळील घनदाट जंगलात पाने तोडण्याच्या कामात व्यग्र होत्या, मात्र तिथेच एका झुडपात दबा धरून बसलेल्या वाघिणीची त्यांना अजिबात चाहूल लागली नाही. या वाघिणीने अत्यंत अचानक आणि हिंसक पद्धतीने या महिलांच्या गटावर हल्ला चढवला. हा प्रसंग इतका अनपेक्षित होता की महिलांना स्वतःला सावरण्याची किंवा जीव वाचवून पळण्याची कोणतीही संधी मिळाली नाही.

## आरबीआयकडून केंद्र सरकारला २.८७ लाख कोटी रुपयांचा डिव्हीडंट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय रिझर्व्ह बँकने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी केंद्र सरकारला २.८७ लाख कोटी रुपयांचा डिव्हीडंट देण्याची घोषणा केली आहे. हा आतापर्यंतचा सर्वात मोठा सरप्लस ट्रान्सफर मानला जात आहे. आरबीआयने केंद्रीय संचालक मंडळाच्या ६२३व्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. या बैठकीचे अध्यक्ष स्थान आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी भूषवले होते. याआधीच्या आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये आरबीआयने सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा डिव्हीडंट दिला होता. तर साल २०२३-२४ मध्येही रक्कम २.१ लाख कोटी होती. सतत वाढणारा डिव्हीडंटने हे स्पष्ट आहे की केंद्रीय बँकचे उत्पन्न आणि आर्थिक स्थिती दोन्ही मजबूत झाली आहे. आरबीआय आपल्या कमाईचा मोठा हिस्सा खर्च आणि रिझर्व्ह काढल्यानंतर सरकारला लाभांशच्या रुपात सरकारला देते.

## निवडक

### सुनेत्रा पवारांच्या राज्यसभेच्या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर

**मुंबई :** उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त राज्यसभेच्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी पोटनिवडणूक जाहीर केली. १८ जून रोजी या जागेसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल घोषित केला जाईल. सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूक जिंकल्यानंतर ६ मे रोजी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

### सिद्धिविनायक मंदिर कॉरिडोरचा मार्ग मोकळा; दर्शन घेणे होणार सोपे

**मुंबई :** अनेक दिवसांपासून रखडलेल्या श्री सिद्धिविनायक मंदिर कॉरिडोरच्या भूमिपूजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत २५ मे रोजी या कॉरिडोरचा शुभारंभ केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे मंदिर परिसरातील वाहतूक, भाविकांची गर्दी आणि सुविधा व्यवस्थापन अधिक सुसूत्र होणार असल्याची माहिती मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी दिली.

## कामोठ्याचा प्रेम घाडगे बनला अग्निवीर

### लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ख्यातनाम असलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे येथील विद्यार्थ्याने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. इयत्ता बारावी कॉमर्स शाखेतून उत्तीर्ण झालेल्या प्रेम प्रकाश घाडगेची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाली असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

खेळामध्ये विशेष प्राविण्य असलेल्या प्रेमने राज्यस्तरीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला होता. सैन्यात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्याने अथक परिश्रम घेतले. २३ फेब्रुवारीला पुणे खडकी येथील BGEमध्ये झालेल्या अग्निवीर भरतीत GD या पदासाठी त्याची निवड झाली. या यशामागे विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात उत्तुंग प्रगती करण्यासाठी त्या नेहमीच प्रोत्साहन देतात. क्रीडा शिक्षक हितेश कडू, रूपाली जोगदंड, पल्लवी बागेकरी व आदित्य पालंडे यांनी प्रेमच्या शारीरिक तयारीसाठी विशेष मेहनत घेतली.

विद्यालयाचे चेअरमन तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रेमचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही देशाप्रति असणारी त्याची निष्ठा अशीच कायम राहो, अशी भावना व्यक्त केली. पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, नेहा खन्ना, मीनल नाईक यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रेमचे अभिनंदन केले.

## नीट पेपरफुटी पुण्यातून तिसरी 'मनीषा' जेरबंद

**पुणे : प्रतिनिधी**

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने आणखी मोठी कारवाई केली आहे. सीबीआयने याप्रकरणी आणखी एका प्राध्यापिकेला अटक केल्याची माहिती आहे. मनीषा हवलदार असे या महिलेचे नाव आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात पुण्यातून मनीषा नावाने अटक होणारी ही तिसरी महिला आहे. मनीषा हवलदार फिजिक्सच्या प्राध्यापिका आहेत, अशी माहिती आहे. एनटीएकडे असणाऱ्या फिजिक्सच्या प्रश्नांना मनीषा हवलदार हिला अ‍ॅक्सेस होता. तसेच यापूर्वी अटक झालेल्या मनीषा मांढरेला मिळून मनीषा हवलदारने फिजिक्सचे प्रश्न लीक केल्याचा आरोप आहे. ते लीक केलेले सर्व प्रश्न तपासण्यात आले. यावेळी लीक झालेले प्रश्न हे नीटच्या प्रश्नपत्रिकेसोबत तंतोतंत जुळल्याचे तपासात समोर आले आहे.

## हिंगणघाटात भीषण अपघात

### एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू

**वर्धा : प्रतिनिधी**

हिंगणघाटच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर हॉटेल तनवीर सगुना फॅक्टरीजवळ शुक्रवारी (दि. २२) अत्यंत भीषण अपघात घडला. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये पती-पत्नी आणि सहा वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आहे.

गजानन वानखेडे (४५), पल्लवी वानखेडे (३८) आणि आरोही वानखेडे (६) हे मोपेड क्रमांक MH ३२ AM १६९४ ने आपल्या सासरवाडीतून कपडे खरेदीसाठी हिंगणघाटकडे येत होते. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर विरुद्ध दिशेने भरधाव येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या मोपेड दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला.



अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलीस ११२ पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिघांनाही मृत घोषित केले.

विशेष म्हणजे मृत झालेली आरोही ही जुळी बहीण असून तिच्या पश्चात आणखी एक बहीण आहे. वानखेडे कुटुंब हे समुद्रपूर तालुक्यातील कुर्ला येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## काशीद बीचवर रोबोटिक वॉटर क्राफ्टने वाचवला तरुणीचा जीव

**मुरूड : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी काशीद बीचवर आलेल्या एका पुणेकर कुटुंबावर शुक्रवारी (दि. २२) सकाळी काळाने झडप घातली होती, मात्र पोलिसांच्या प्रसंगावधान आणि तत्परतेमुळे एक मोठा अनर्थ टळला असून एका २० वर्षीय तरुणीला समुद्रात बुडताना अगदी ऐनवेळी सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेल्या "रोबोटिक बोयो"ची उपयुक्तता या प्रसंगामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. या रिमोट ऑपरेटेड वॉटरक्राफ्टमुळे तरुणीचा जीव वाचविण्यात प्रशासनाला यश आले आहे.

शुक्रिवारी सकाळी ७.४० वाजण्याच्या सुमारास पुणे येथील रहिवासी असलेले आकाश साबळे आणि सिद्धी साबळे आपल्या कुटुंबासह काशीद समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी आले होते. हे कुटुंब पोहण्यासाठी



पाण्यात उतरले, परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने सिद्धी साबळे अचानक समुद्राच्या खोल पाण्यात ओढली जाऊ लागली आणि बुडत असल्याचे लक्षात आले.

या कठीण प्रसंगी कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई (बक्कल नंबर १०२८) प्रवीण रोटकर आणि पोलीस शिपाई (बक्कल नंबर १५३१) जितेंद्र माने यांनी जराही वेळ न गमावता तत्काळ धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या पोलीस कर्मचाऱ्यांनी रोबोटिक वॉटरक्राफ्टच्या मदतीने वेगाने समुद्रात धाव घेत बुडणाऱ्या सिद्धीला सुखरूप बाहेर काढले. भरतीच्या वेळी समुद्रात न उतरण्याचे आणि सुरक्षा सूचनांचे पालन करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले आहे.

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने रायगड जिल्ह्यातील तीन समुद्रकिनाऱ्यांवर रोबोटिक वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून दिले आहेत. नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर येथील समुद्रकिनाऱ्यांचा यात समावेश आहे. बुडणाऱ्या पर्यटकांच्या बचावासाठी त्यांचा वापर केला जातो. मागील महिन्यात काशीद समुद्रकिनाऱ्यावर बुडणाऱ्या दोन पर्यटकांचा जीव या रोबोटिक वॉटर क्राफ्टने वाचवला होता.

### कोकण आयुक्तांकडून यंत्राची पाहणी

पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यासाठी उपयुक्त ठरलेल्या "रोबोटिक वॉटर क्राफ्ट" जीवरक्षक यंत्राचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल येथील नागाव बीच येथे उपस्थित होत्या. या वेळी जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, तहसीलदार विक्रम पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक व जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कर्मचारी उपस्थित होते.

## कळंबोली सर्कल उड्डाणपुलाचे काम प्रगतिपथावर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायन-पनवेल मार्गावरील कळंबोली सर्कल येथे सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाला वेग आला असून प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने पुढे सरकत आहे. या प्रकल्पातील विविध टप्पे वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. सध्या आर्म-३ विभागातील डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले असून उर्वरित भागातही काम जलदगतीने सुरू आहे. आर्म-५ आणि आर्म-६ या जंक्शनच्या (महत्त्वाच्या जोडणाऱ्या भागाच्या) कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. कारण हा प्रकल्पातील 'क्रिटिकल स्पॅन' मानला जातो. अधिकाऱ्यांच्या मते हा भाग सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

दरम्यान, या कामाची आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाहणी केली. या वेळी अंशुमनी श्रीवास्तव (प्रादेशिक अधिकारी, एनएचएआय), हिंगे सर (कार्यकारी अभियंता,



एमएसआयडीसी), भरणीकुमार सर (टीआयपीएल), राजेंद्र पाटील, ऋषिकेश कोरडे (प्रकल्प व्यवस्थापक, टीआयपीएल), भिडे सर (टीपीएफ), श्याम भोरे (टीपीएफ) आदी उपस्थित होते.

कामाच्या प्रगतीसोबत वाहतूक व्यवस्थापनालाही विशेष महत्त्व दिले जात आहे. कळंबोली परिसरात काही प्रमाणात वाहतूक कोंडी होत असली तरी रॅम्प व डायव्हर्जनचे काम सुरू असल्याने परिस्थिती नियंत्रणात आहे. पर्यायी मार्गांची योग्य आखणी केल्यामुळे वाहनचालकांना त्रास होत नाही, अशी माहिती प्रकल्पाचे मॅनेजर हेड ऋषिकेश कोरडे यांनी दिली.

आर्म-३साठी आवश्यक डायव्हर्जन काम ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. उर्वरित आर्म्समधील संरचनात्मक काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. जंक्शन भाग पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण उड्डाणपुलाच्या जोडणीचे काम वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे.

# १५ ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सीचालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे -परिवहनमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीस राजेश नार्वेकर, रवी गायकवाड, संदेश चव्हाण, डॉ. ना.कों. भोसले, डॉ. श्यामकांत



देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. या प्रशिक्षणासाठी सुमारे चार हजार शिक्षक सहभागी होणार असून, प्रत्येक महिन्यातील चार शनिवार आणि रविवार चालकांच्या सोयीप्रमाणे किमान चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. काही शिक्षक मानधनाशिवाय प्रशिक्षण देणार असून, काहींना प्रति तास एक हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

मराठी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक मानधनाच्या खर्चासाठी मंत्री श्री. सरनाईक यांच्या विनंतीनुसार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित खर्च परिवहन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

रिक्षा-टॅक्सी चालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्यांना परिवहन विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी चालकांची मराठी भाषेवरील व्यवहारिक क्षमता तपासण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये तोंडी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहितीही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.

परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांनी प्रशिक्षण केंद्रांची अंतिम यादी निश्चित करून ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. रिक्षा-टॅक्सी चालकांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यांनी विनामूल्य उपलब्ध असलेले ऑनलाईन अथवा ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन व्यावहारिक मराठी आत्मसात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. चालकांच्या वेळेनुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा पुनरुच्चार केला.

### प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तयारी

***सचित्र आणि सोप्या भाषेतील पाठ्यक्रम पुस्तिका तयार करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रांतर्गत उपकेंद्रे उभारली जाणार आहेत. रिक्षा-टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडो वाहनांवर मराठी संदर्भातील जनजागृती स्टिकर्स लावले जाणार आहेत. मराठी भाषा प्रचार-प्रसारासाठी विशेष बॅनर्स तयार करण्यात येत आहेत.***

## पत्नीने पतीच्या गुप्तांगावर चाकूने केला हल्ला, सासूवरही फेकले गरम पाणी

**पनवेल : वार्ताहर**

कौटुंबिक वादाचा राग मनात धरुन एका ३१ वर्षीय विवाहितेने आपल्या पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार करुन त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना तळोजा येथे उघडकीस आली आहे. या विवाहितेने आपल्या सासूच्या चेहर्यावर देखील गरम पाण्यासारखे रासायनिक द्रव्य ओतून तिला दुखापत करुन पलायन केले आहे. तळोजा पोलिसांनी या घटनेनंतर फरार झालेल्या विवाहितेवर गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरु केला आहे.




या घटनेतील ४५ वर्षीय जखमी पती रिक्षा चालक असून तो तळोजा गावात एकत्र कुटुंबासह राहण्यास आहे. मात्र या रिक्षा चालकाच्या पत्नीला एकत्र कुटुंबामध्ये राहायचे नव्हते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून या दोघा पती पत्नीमध्ये याच कारणावरून वाद सुरु होते.

तसेच त्यांच्यामध्ये वारंवार भांडण देखील होत होते. याच कौटुंबिक कारणावरुन या रिक्षा चालकाच्या पत्नीने पतीचे पुरुषत्व भंग करण्याच्या उद्देशाने धारदार चाकूने थेट त्याच्या गुफ्तांगावर वार करुन गंभीर दुखापत केली.

यावेळी सासु वाचवण्यासाठी धावून आली असताना, या विवाहितेने तिच्यावरही घरात असलेले गरम पाण्यासारखे कडक द्रव्य तिच्या तोंडावर ओतून तिला देखील दुखापत केली. या क्रूर कृत्यानंतर या विवाहितेने गुन्ह्यात वापरलेला चाकू सोबत घेऊन रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घरातून पलायन केले. या घटनेनंतर जखमी पती व सासु या दोघांनी रुग्णालयात उपचार घेऊन तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेतील फरार झालेल्या विवाहितेच्या शोधासाठी पोलिस पथक रवाना करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत यांनी दिली.

## दुसरा विवाह करून ८० लाखांची केली फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पहिल्या पतीसोबत घटस्फोट झालेला नसताना देखील दुसरा विवाह करून ५० वर्षीय इसमाची ८० लाख ४४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पत्नी आणि तिच्या आईविरोधात खारघर पोलीस ठाण्यात २१ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पन्नास वर्षीय इसम आर्किटेक्ट असून ते खारघर, सेक्टर २३ येथे राहतात. २०२२ पासून एका महिलेने त्यांची दिशाभूल करून पहिल्या पतीपासून घटस्फोट झालेला नसताना देखील त्यांच्याशी दुसरा विवाह केला आणि त्यांच्याकडून ८० लाख ४४ हजार ५३१ रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केली.

तसेच इंदिरा आयव्हीएफ सेंटर वाशी येथे २०१८ मध्ये त्यांच्याशी विवाह झाला असल्याचे खोटे शपथपत्र सादर केले आणि फायनान्स कंपनीकडून कर्ज घेण्यासाठी खोटे शपथपत्र सादर केले तसेच त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देखील दिली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात दोघींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## रायगड जिल्ह्यात १८ मेअखेर ६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

### ६४ गावे व २३० वाड्यांतील १ लाख १३ हजार ७०९ नागरिकांना दिलासा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद रायगडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दि.१८ मे २०२६ अखेर जिल्ह्यात एकूण ६४ टँकर कार्यरत असून त्याद्वारे ६४ गावे व २३० वाड्यांमधील १ लाख १३ हजार ७०९ नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जिल्ह्यातील सर्व टँकर खासगी स्वरूपातील असून शासकीय टँकर



अथवा मदतीचे टँकर कार्यरत नाहीत. सर्वाधिक टंचाईग्रस्त परिस्थिती पेण तालुक्यात असून येथे ९ गावे व ७६ वाड्यांसाठी १२ टँकर कार्यरत आहेत. या माध्यमातून २४ हजार ७६५ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

महाड तालुक्यात १४ गावे व ८७ वाड्यांसाठी ९ टँकरद्वारे २२ हजार २४३ नागरिकांना पाणीपुरवठा सुरू आहे. पनवेल तालुक्यात १० गावे व ८ वाड्यांसाठी ९ टँकरद्वारे १८ हजार ५५३ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. कर्जत तालुक्यात ३ गावे व ११ वाड्यांसाठी ८ टँकर, खालापूर तालुक्यात ५ गावे व ९ वाड्यांसाठी ६ टँकर, तर माणगाव तालुक्यात ४ गावे व १५ वाड्यांसाठी ५ टँकर कार्यरत आहेत.

याशिवाय अलिबाग तालुक्यात ४ गावे, उरण तालुक्यात ४ वाड्या, सुधागड-पाली तालुक्यात २ वाड्या, रोहा तालुक्यात ३ गावे, पोलादपूर तालुक्यात ५ गावे व १४ वाड्या, म्हसळा तालुक्यात ६ गावे व १ वाडी, तसेच श्रीवर्धन तालुक्यात १ गाव व ३ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेकडून पाणीटंचाईग्रस्त भागांवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहे.


## पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध

### भीतीपोटी अनावश्यक खरेदी टाळावी- मंत्री छगन भुजबळ

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पेट्रोल-डिझेलच्या दरांमध्ये चढ-उतार पाहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात इंधनटंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरविल्या जात आहेत. मात्र, महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

माध्यमांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले की, राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई



नाही. त्यामुळे नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल-डिझेल खरेदी करून साठवणूक करू नये. गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत सुमारे २० टक्के अधिक पेट्रोल-डिझेलची विक्री झाल्याची माहिती त्यांनी दिली.

केंद्र व राज्य शासन प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात इंधन उपलब्ध करून देण्यास सक्षम आहेत. त्यामुळे अफवा किंवा भीतीच्या वातावरणामुळे अतिरिक्त साठा करण्याची आवश्यकता नाही," असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

यावेळी त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील गेल्या काही दिवसांतील इंधन विक्रीची आकडेवारीही माध्यमांसमोर मांडली. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## स्टीलच्या मालाची चोरी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

९४ हजार ५०० रुपये किमतीच्या स्टीलच्या मालाची चोरी केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात पुन्हा दाखल करण्यात आला. ताराचंद इन्फ्रा लॉजिस्टिक सोल्युशन लिमिटेड या कंपनीकडून स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया स्टील मार्केट कंपनी या कंपनीकडे येणाऱ्या स्टीलचा माल डिस्ट्रीब्यूशन करण्याचे काम चालते. स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया या कंपनीच्या वजन काट्याचे कॉलीब्रेशन करण्यासाठी लागणारे ९४ हजार ५०० रुपयांचे बेचाळीस नग चोरांनी चोरून नेले.

## एमआयडीसीच्या सांडपाण्याने शेततळ्यातील हजारो मासे मृत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील शेडसई गावात एमआयडीसी परिसरातून सोडण्यात आलेल्या रासायनिक सांडपाण्यामुळे एका प्रगतशील शेतकऱ्याच्या शेततळ्यातील हजारो मासे मृत झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दोषींवर कठोर कारवाई करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

शेडसई येथील गट क्रमांक ५८ मधील जमिनीवर प्रगतशील



शेतकरी विलास सिताराम म्हात्रे यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये शेततळे तयार केले होते. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून त्यांनी या तळ्यात मत्स्यपालन सुरू केले होते. चितळा, बोईट, कट्टा आणि इतर विविध जातींच्या माशांचे त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने संगोपन केले होते. गेल्या काही वर्षांपासून हा व्यवसाय चांगल्या पद्धतीने सुरू होता.

मात्र, नुकत्याच आलेल्या भरतीच्या पाण्यासोबत एमआयडीसी परिसरातील रासायनिक केमिकलयुक्त सांडपाणी या भागात सोडण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. हे प्रदूषित पाणी थेट म्हात्रे यांच्या बंदिस्त शेततळ्यात शिरल्याने तळ्यातील असंख्य मासे तडफडून मृत झाले. मृत माशांचा दुर्गंध परिसरात पसरला असून पर्यावरणीय धोक्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेनंतर विलास म्हात्रे यांनी महसूल व कृषी विभागाकडे धाव घेतली असून तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक यांना लेखी निवेदन देत तात्काळ पंचनामा करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रदूषित पाणी सोडणाऱ्या संबंधित एमआयडीसी कंपनीचा शोध घेऊन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## आयएसए लॉजिस्टिक कंपनीच्या वतीने वाहतूक पोलिसांचा यथोचित सन्मान

**उरण : प्रतिनिधी**

उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे नियमित कडक उन्हाळा, मुसळधार पावसासह कडक्याच्या थंडीतही अशा तिन्ही ऋतुमध्ये अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करीत अविरतपणे दाखवलेल्या कर्तव्या च्या मेहनतीची दखल घेऊन समाजासाठीच्या दिलेल्या निःस्वार्थ सेवेबद्दल समाधान व्यक्त करून सलाम करण्यासाठी सदिच्छा म्हणून, जेएनपीए परिसरात कार्यरत असलेल्या आयएसए लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी सदभावना कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.

सदर कार्यक्रमात उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस




निरीक्षक अतुल दहिफळे यांच्यासह त्यांच्या वाहतूक पोलिस पथकात काम करणाऱ्या पोलिस अंमलदारांना भेट वस्तूसह पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.नियमित रस्त्यावर वाहतूक सुरळीत करून वाहन चालक व पादचाऱ्यांना सहकार्य करून त्यांचा प्रवास सुखकर करणाऱ्या पोलिस अधिकारी आणि अंमलदारांना आयएसए लॉजिस्टिक कंपनी प्रशासनाने सन्मानित केल्याने उपस्थित पोलिस अंमलदार कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आंनद द्विगुणित झालेला दिसत होता.

या कंपनीचे चेअरपर्सन संतोष शेट्टी व कंपनीचे एच आर अभय वायकर यांनी स्वतः उपस्थित राहून हा उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी अंमलदार यांचा यथोचित सन्मान करणे, ही कधी कोणाला न सुचणाऱ्या आनंददायी कार्यक्रमाचे आयोजन केल्याने उपस्थित पोलिस अंमलदारांनी आयएसए लॉजिस्टिक कंपनी व्यवस्थपनाचे आभार व्यक्त केले आहेत.

## पेणमध्ये संयुक्त जयंती उत्सव साजरा

**पनवेल : वार्ताहर**

बहुजन विद्यार्थी संघटना व रिपब्लिकन सेना पेण शहराच्या वतीने भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा संयुक्त जयंती महोत्सव पेण शहरांमध्ये पार पडला. त्यावेळेला या प्रसंगी रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अमन आनंदराज आंबेडकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.



याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे उपस्थित होते . त्यांचे स्वागत अमन आनंदराज आंबेडकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले .

## शिल्प चौक पोलीस बीट रूम कार्यान्वित करण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर २० येथील शिल्प चौक परिसरात पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेली बीट रूम सध्या रिक्त व निष्क्रिय अवस्थेत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका परेशा ब्रिजेश पटेल यांनी खारघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक यांना निवेदन देऊन सदर बीट रूम तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे.

शिल्प चौक परिसरात सायंकाळच्या वेळेत वाहतूक कोंडी, बेकायदेशीर पार्किंग तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या वाढत असल्याने त्या ठिकाणी पोलीस उपस्थिती आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दररोज सायंकाळी ५ ते रात्री १२ या वेळेत बीट रूम सुरू ठेवून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे परिसरातील वाहतूक व पार्किंग समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असा विश्वास नगरसेविका परेशा पटेल यांनी व्यक्त केला आहे.

## नवी मुंबईत आठवड्यातून दोन दिवस संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सोमवार, दि. २५ मे २०२६ पासून १० टक्के पाणी कपात लागू करण्यात येणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. मोरबे धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने तसेच वाढत्या तापमानामुळे पाण्याचा वापर वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आठवड्यातून दोन दिवस संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. ही २० टक्के पाणी कपात सोमवार, दि. २५ मे २०२६ पासून अमलात येणार आहे.

महापालिकेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित विभागांमध्ये पुढीलप्रमाणे पाणीपुरवठा बंद राहणार आहे :

बेलापूर -सोमवार व शुक्रवार, नेरुळ - मंगळवार व शनिवार, तुर्भे - बुधवार व रविवार, वाशी - गुरुवार व सोमवार, कोपरखैरणे - मंगळवार व शनिवार, घणसोली - बुधवार व रविवार, ऐरोली - शुक्रवार

दिघा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वेळापत्रकानुसारतसेच सिडको नोडमधील खारघर व कामोठे येथे मोरबे धरणातून होणारा पाणीपुरवठा दर शुक्रवारी पूर्णपणे बंद राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.महापालिकेने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले असून जलस्रोत आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची सातत्यपूर्ण कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेल शहरात २५ मेपासून आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा राहणार बंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) तसेच देहरंग धरण या स्त्रोतांमधून पाणीपुरवठा करण्यात येतो. उन्हाळयाच्या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व एमआयडीसी कडून कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असून, इतर वेळी इलेक्ट्रिक शटडाऊन व ब्रेकडाऊनमुळे या दोन संस्थाकडून पाणीपुरवठा कमी होत आहे.

त्यामुळे शहराची दररोजची गरज भागविण्यासाठी देहरंग धरणातील अतिरिक्त पाणीसाठ्याचा वापर करण्यात येत आहे. यामुळे देहरंग धरणातील पाणीसाठा कमी झाला असून, धरणात पाणीसाठा पुरेसा उपलब्ध होईपर्यंत सोमवार दि. २५ मे २०२६ पासून पनवेल शहरातील जलकुंभनिहाय आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे तसेच पाणीपुरवठा बंद राहणाऱ्या दिवशी आवश्यक त्या प्रमाणात पाणीसाठा करून ठेवण्याचे आवाहन केले आहे

**जलकुंभनिहाय पाणीपुरवठा बंद राहण्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे**



**सोमवार** – मार्केट यार्ड उंच जलकुंभ व भाजी मार्केट जलकुंभ क्षेत्रातील पाणीपुरवठा बंद राहील तसेच चौकोनी टाकी व्दारे पटेल पार्क, जैन मंदिर , गणपती मंदिर, मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठेगल्ली ते विरूपाक्ष मंदिर, सीटी स्टोअर , सिनीअर ज्यूनिअर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पीटल, गायकर गल्ली, शुभलाभ सोसायटी ते सहयोग नगर, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी, उमाशंकर सोसायटी ते यशोचर्धन् सोसायटी, आदर्श हॉटेल ते रत्नेश सोसायटी, कुकेर सोसायटी शुभलाभ सोसासयटी, धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथ नगर, मुनोथ नगर ई विंग , प्रिन्स पॅराडाईज सोसायटी, सनराईज सोसायटी, जोशी आळी, पंचायत समिती ते झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग्ज इलेक्टॉनिक, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिर, लक्ष्मी वसाहत या ठिकाणी होणारा पाणी पुरवठा बंद राहिल.

**मंगळवार**– पटेल मोहल्ला उच्च जलकुंभ, पायोनियर उच्च जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा व ठाण रोड बंद राहिल तसेच चौकोनी टाकीमधून माणिक नगर, अशोका गार्डन, केशरबाग, स्नेहसदन, यशोदिप शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकर वाडा, गुढेकर डेअरी ते रेखी हॉटेल, घाटे आळी , गावदेवी पाडा, परदेशी आळी गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्री लॉज पर्यंत, गुणे हॉस्पीटल ते लाईफ लाईन हॉस्पीटल ते खुटकर मटण शॉप, दांडेकर हॉस्पीटल ते अच्युत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पीटल, परदेशी आळी त , रत्ना रेसिडन्सी, अष्ट विनायक कॉलनी गुणे हॉस्पीटल ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत , यशोपुरम सोसायटी जुना पोस्ट बाजू मुनोथ नगर ए व बी विंग, जय भारत नाका ते भिडे घरापर्यंत, गांगल वाडा ते जयभ्जारत नाका, गोडसे आळी विरूपाक्ष मंदिर ते दगडी शाळा , मनिष मार्केट , अन्नपुर्णा ते निसर्ग बिल्डींग , त्रिमुर्ती सहनिवास कापड बाजार , गोखले हॉल ते प्रज्ञा सोसासटी, रतन टॉकीज परिसर

**बुधवार**– एच.ओ.सी. उंच जलकुंभ एचओसी कॉलनीसह छोटा खांदा व मोठा खांदा गुरुवार ठाणा नाका उंच जलकंभ संपुर्ण साईनगर भाग बंद राहील. शुक्रवार – गोल टाकीतून होणारा मिडल क्लास होऊसिंग सोसायटी भाग १, व एस के बजाज भाग बंद राहिल शनिवार– गंगाराम सिनेमा उंच जलकुंभातून तक्का गाव व कॉलनी भागात होणारा पाणीपुरवठा बंद राहिल.

**रविवारी** शहरातील सर्व भागात पाणीपुरवठा सुरू राहील. या बंद कालावधीत संबंधित भागातील संपूर्ण पाणीपुरवठा बंद राहणार असून, उपलब्ध पाणीपुरवठ्यानुसार वितरणाच्या वेळेत वेळोवेळी बदल करण्यात येणार असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे.पनवेल महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर 'रयत' च्या समन्वय समिती सदस्यपदी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कडुन अभिनंदन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शिक्षण समितीच्या समन्वय समिती सदस्य म्हणून संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या तथा संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांची निवड करण्यात आली.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर ह्या संस्थेच्या लाईफ वर्कर असून या आधी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदही त्यांनी भूषविले आहे. आतापर्यंत संस्थेचा उपक्रमशील शिक्षिका तसेच पनवेल तालुका व रायगड जिल्हा परिषदेचा जिल्हा आदर्श शिक्षिका आदी विविध पुरस्कारांनी त्यांना गौरवान्वीत करण्यात आले असून रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शिक्षण समितीवर समन्वय समिती सदस्य म्हणून पुढील तीन वर्षांसाठी निवड झाल्याबद्दल ज्योत्स्ना ठाकूर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार तथा ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेज विभागाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य आणि संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी,विजयनाना घरत व ॲड.राहुल घरत,विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आणि संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आदींनी अभिनंदन केले.

# भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी जागे व्हा, निलेश पाटील यांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील पर्डी क्रमांक ७४ अ या ४.२२ गुंठे जमिन मालकाचे नाव सातबाऱ्यावर चढविण्यासाठी तब्बल १ लाख रूपयांची लाच मागणारा गजाआड झाला. पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या तक्रारीमुळे लाचखोरीचा भस्म्या झालेला मंडल अधिकारी गोवर्धन माने ३० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडला. परंतू केवळ महसूल विभागात हा भ्रष्टाचार नाही तर पनवेल तालुक्यातील सर्वच शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. महानगरपालिका, सिडको, अप्पर तहसिलदार, पनवेल भूमिअभिलेख, प्रांत, सब रजिस्टार ऑफिस आदी कार्यालये भ्रष्टाचाराने पोखरलेली आहेत.

पनवेल तालुक्यातील बापजाद्यांच्या कमाईतून मिळवलेल्या जमिनीवर सरकारी अधिकाऱ्यांचा डोळा असून शेकडो अधिकाऱ्यांनी सोन्याच्या तुंबड्या भरल्या आहेत. काम फुकट करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी प्रत्येक काम पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत असा आरोप निलेश पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. आमच्या हक्काच्या कामासाठी पैसे का द्यायचे असा प्रश्न विचारल्याशिवाय गोरगरीब शेतकऱ्यांची कामे होणार नाहीत. पैशासाठी कोणाचे काम अडविले जाणार असेल तर माझ्याशी



संपर्क साधा मी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेन आवाहन निलेश पाटील यांनी केले.

सातबारावर नाव नोंदविण्यासाठी निलेश पाटील यांनी पनवेलच्या तहसिलदार मिनल भामरे यांनी नोव्हेंबर २०२५ रोजी अर्ज केला होता. डिसेंबर किंवा जानेवारीत हे काम पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतू संबंधित जागेची किंमत कोट्यवधी रूपये आहे, त्यामुळे याकामासाठी १ लाख रूपये लागतील अशी मागणी केली. माझी प्रॉपर्टी किती कोटींची आहे, यांच्याशी मंडल अधिकारी गोवर्धन माने यांचा काय संबंध असा प्रश्न उपस्थित करून पैसे देण्यास निलेश पाटील यांनी नकार दिला. पैसे देण्यास नकार दिल्यामुळे माने याने थम्ब इंप्रेशनचे काम जाणिवपुर्वक रखडविले. अखेर तड़जोडीअंती सुरूवातीला ५० हजार आणि ३० हजारात माने काम करण्यास तयार झाला. त्यामुळे रायगड लाचलुचपत विभागाने लावलेल्या सापळ्यात माने अडकला. सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक करण्याचा हा प्रकार पनवेलमध्ये नवीन नाही. पनवेल तालुका म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांसाठी अक्षरश सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. पनवेलमध्ये पोस्टिंग मिळवण्यासाठी कोट्यवधींची गुंतवणूक म्हणजेच वरिष्ठ कार्यालयाला पैसे द्यायचे, आणि पोस्टींगसाठी गुंतवलेली रक्कम दामदुप्पटपणे वसूल करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची कामे अडवून भ्रष्टाचाराच्या मार्गाने वसूल करायची. यासाठी स्थानिक जमिनदार, वारसदारांची पिळवणूक सुरू आहे. यामुळे पनवेलमधील जमीनमालक हतबल झाला आहे. अनेक गरीब शेतकऱ्यांची कामे लाच देण्यासाठी पैसे नसल्यामुळे अडकलेली आहेत.

पनवेलमधील एकही सरकारी कार्यालय याला अपवाद नाही. उलट इतर तालुक्यांपेक्षा पनवेल, उरण आणि आसपासच्या तालुक्यातील विकासामुळे लाचेचा दर देखील चढा आहे. याला आळा घालायचा असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी जागे होण्याची गरज आहे. पैसे मागणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आवाज उठवून संबंधितांना धडा शिकवल्याशिवाय हे थांबणार नाही. मी पनवेलचे आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि आमदार विक्रांतदादा पाटील यांची भेट घेवून याबाबत ठोस पावले उचलण्याची मागणी करणार असल्याचे निलेश पाटील यांनी सांगितले. नागरिकांना सरकारी कार्यालयातील कामकाजात काही अडथळे आल्यास माझ्याशी ९८६७७७९७७७ या मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# पनवेल मनपा मुख्यालयात बकरी ईद २०२६ निमित्त बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २७मे ते ३० मे २०२६ दरम्यान बकरी ईद सण साजरा करण्यात येणार असून, सदर सणाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पूर्वतयारी व नियोजनाबाबत महानगरपालिकेमध्ये महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीत बकरी ईद निमित्त तात्पुरत्या कत्तलखान्यांना परवानगी देणे, स्वच्छता, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था तसेच पशुवैद्यकीय नियमांचे पालन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभाग प्रमुख व अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

यावेळी उप महापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, विरोधी पक्ष अरविंद म्हात्रे, महापालिका सदस्य, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, मनपा उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त वैभव विधाते, सहायक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले, सहाय्यक पोलिस आयुक्त विक्रम कदम, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, पशु वैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, महापालिका सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधिकारी, पोलिस विभागाचे अधिकारी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदधिकारी, समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तात्पुरत्या कुर्बानी सेंटरसाठी तसेच मोठ्या प्राण्यांसाठी (म्हैसवर्गीय) सेंटरना परवानगी देण्यासाठी आवश्यकतेनुसार परवानगी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रभाग समिती निहाय प्रभाग अधिकारी यांना परवानगी देणेकरिता प्राधिकृत करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार सक्षम अधिकारी म्हणून शासनाच्या ४ पशुधन विकास अधिकाऱ्यांची मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाकडे करण्यात आली आहे.

सदर बैठकीत तात्पुरत्या कत्तलखान्यांसाठी शासनाकडून प्राप्त सूचनांचे, कायदे व नियम, तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कुर्बानीनंतर निर्माण होणाऱ्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावणेबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. मांस वाहतूक करताना स्वच्छता व सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक असल्याच्या सूचना देण्यात आल्या. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल हे स्पष्ट करण्यात आले.

महानगरपालिकेमार्फत बकरी ईद सण शांततापूर्ण, स्वच्छ व सुव्यवस्थित वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, पोलिस बंदोबस्त तसेच स्वच्छता निरीक्षकांमार्फत स्वच्छता व्यवस्था ठेवण्यात येणार आहे. मागील वर्षीप्रमाणेच या वर्षीदेखील प्रशासनाकडून चोख व्यवस्था करण्यात येणार असल्याचे महापौरांनी सांगितले.




# 'स्वराज्य'च्या इंटिरिअर कामाला ब्रेक; कोकण रेल्वेला महापालिकेची कायदेशीर नोटीस

**पनवेल : वार्ताहर**

महापालिकेचे महत्त्वाकांक्षी मुख्यालय असलेल्या 'स्वराज्य' इमारतीच्या अंतर्गत सजावटीच्या कामात मोठी दिरंगाई होत असल्याने महापालिकेने कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला कायदेशीर नोटीस बजावली आहे. ठरलेल्या टप्प्यांनुसार कामाचा वेग नसल्याने प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली आहे.

पनवेल नगरपरिषदेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला. अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्याने जुनी इमारत अपुरी पडू लागली होती. त्यामुळे महापालिकेने सिडकोकडून तब्बल २८ कोटी रुपये खर्च करून ५ एकर भूखंड विकत घेतला. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीसमोरील या जागेवर 'स्वराज्य' मुख्यालयाची उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान, इमारतीतील फर्निचर, इलेक्ट्रिकल व्यवस्था, फाइल सिस्टीम आणि इतर अंतर्गत सजावटीसाठी १६२ कोटी रुपयांचे कंत्राट कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला देण्यात आले होते. मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याची हमी कंपनीने दिली होती.

मात्र, प्रत्यक्षात काम सुरू होऊन सहा महिने उलटूनही कामाचा वेग अत्यंत मंद असल्याचे समोर आले आहे. महापालिकेने यापूर्वी अंतर्गत नोटीस देत कामाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली होती. तरीही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने अखेर गेल्या आठवड्यात कंपनीला कायदेशीर नोटीस बजावण्यात आली. आता या नोटिसीला समाधानकारक उत्तर न दिल्यास अथवा कामात गती न आणल्यास कंपनीचे कंत्राट रद्द करण्याची शक्यता व्यक्त होत आहे. 'स्वराज्य' या भव्य मुख्यालयाच्या बांधकामासाठी महापालिकेने सुमारे १४० कोटी रुपये खर्च केले आहेत. आता प्रशासनाचा भर अंतर्गत सजावटीची कामे वेगाने पूर्ण करून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे स्थलांतर नव्या वास्तूत करण्यावर आहे. अन्यथा सध्याच्या विविध कार्यालयांच्या देखभालीचा अतिरिक्त आर्थिक भार महापालिकेवर कायम राहणार आहे.

**महापालिकेच्या 'स्वराज्य' मुख्यालयातील इंटिरिअरचे काम अपेक्षित गतीने होत नाही. यापूर्वी कंपनीच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. मात्र सुधारणा न झाल्याने अखेर कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.**
**– संजय कटेकर,**
**शहर अभियंता,**
**पनवेल महापालिका**

# महापौर नितीन पाटील यांचा कामोठे आणि नौपाडा दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि परिसर स्वच्छतेच्या कामाला वेग आला आहे.

महापौर नितीन पाटील यांनी या कामांवर विशेष भर दिला असून, त्यांनी स्वतः कामोठे आणि नौपाडा परिसराचा दौरा करून सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. महापौरांनी कामोठे येथील सेक्टर १८, १२, १३ तसेच नौपाडा परिसरातील नाले, गटारे आणि रस्त्यांची बारकाईने पाहणी केली. पावसाळ्यात नागरिकांना जलमय परिस्थितीचा सामना करावा लागू नये आणि पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने व्हावा, यासाठी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सफाई अत्यंत प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

तसेच रस्त्यांची स्वच्छता राखण्याबाबतही आवश्यक त्या सूचना



केल्या. या पाहणी दौऱ्यादरम्यान नगरसेवक प्रदीप भगत, दिलीप पाटील, रवी जोशी, विकास घरत यांच्यासह पालिकेचे संबंधित अधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# उदरभरण नोहे, जाणि जे यज्ञकर्म

आता जागतिकीकरणासोबत पाश्चिमात्यांच्या जगातील अनेक खाद्यपदार्थ भारतीयांच्या आहारशास्त्रात लुडबूड करू लागले असून त्या पदार्थांच्या चवीने नव्या पिढीस भुरळदेखील घातली असली, तरी आपल्या मातीशी आणि जीवनशैलीशी नाते नसलेले पदार्थ स्वीकारण्यास आपले आरोग्य तयार नसते असे स्पष्ट होऊ लागले आहे.

**खाणे हा केवळ पोट भरण्याचा उपचार नसून एक पुण्यकर्म आहे अशी आपल्या संस्कृतीची शिकवण असल्याने, आहार हे एक शास्त्रदेखील मानले जाते. खाद्यसंस्कृती हे वेगवेगळ्या समाजघटकांचे वैशिष्ट्य असते. समाजातील वेगवेगळ्या घटकांची जशी जीवनशैली असते, तशीच त्या घटकांची एक खाद्यसंस्कृतीदेखील असते, आणि ही खाद्यसंस्कृती. त्या समाजघटकांस वेगळी ओळख निर्माण करून देत असते. त्यामुळे, कोणी काय खावे हा ज्याचा त्याचा प्रश्न असला, तर आपल्या समाजघटकाची ओळख असलेल्या खाद्यसंस्कृतीची प्रतिष्ठा जपण्यासाठी मात्र समाज सजग असतो असे दिसून येते. म्हणूनच, महाराष्ट्रात खान्देशी ठेचा, कोल्हापुरी रस्सा, कोकणातील सोलकढी आणि वेगवेगळ्या प्रांतांतील खाद्यसंस्कृती संपन्न करणाऱ्या पदार्थांचा तोरा सांभाळणारे खवैयेदेखील त्या त्या पदार्थांचा मान राखतात. विदेशात सहसा लोकप्रिय असलेले अनेक पदार्थ येथे मात्र विविध विकार, आजारांना आमंत्रण देणारे ठरत असल्याचे सिद्ध झाले असून विशेषतः, पाव, पिझ्झा, बर्गर, फास्टफूड यांसारख्या पदार्थांनी तरुणांमध्ये आरोग्याच्या समस्या वाढत असल्याचे दिसू लागले आहे. अगोदरच, संगणकयुगाच्या प्रभावामुळे शारीरिक व्यायाम कमी झाल्याने, स्थूलपणा, हालचाली वा भूक मंदावणे, वजन वाढणे किंवा अपचनासारखे विकार बळावले आहेत, आणि या आहारविषयक सवयींपासून तरुणाईला वाचवावे कसे हा प्रश्न आरोग्यक्षेत्राच्या चिंतेचा मुद्दा ठरत आहे. अशा परिस्थितीत, भारतीयांच्या भोजनाच्या ताटातील पारंपरिक पदार्थांना प्रोत्साहन देण्याची योजना सरकारी स्तरावर आखली जावी आणि त्याचा प्रसार करून पारंपरिक आहारशैली पुनरुज्जीवित करावी या सरकारच्या प्रयत्नांचे आता सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत, ही बाब उल्लेखनीय ठरते. भारतीयांच्या परंपरागत आहारशैलीत अधिक प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या ज्वारी, बाजरी, नाचणी अशा धान्याचा अलीकडे आहारात वापर वाढला असल्याचे काही सर्वेक्षणांतून सिद्ध झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पारंपरिक धान्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना 'श्रीअन्न' असे नाव दिले आणि त्याचा वापर वाढविण्याची समाजास आवाहन केले. कोणे एके काळी केवळ गरिबांचे अन्न मानल्या जाणाऱ्या या धान्यास आता धनिकांच्या भोजनातही मानाचे पान मिळू लागले असून ज्वारी, बाजरी, नाचणीच्या पदार्थांचे अधिकाधिक सेवन करण्याची सवय आता वाढू लागली आहे, असे एका सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. श्रीअन्न ही आता केवळ ठरावीक हंगामातील आहारशैली राहिली नसून असंख्य भारतीय कुटुंबांच्या जेवणाच्या ताटातील मुख्य अन्नाचा हिस्सा होऊ लागली आहे. एका सर्वेक्षणानुसार, देशातील ७० टक्के कुटुंबांच्या आहारात नियमितपणे श्रीअन्नाचा समावेश होत आहे, आणि ज्वारी, बाजरी, नाचणीच्या पदार्थांस पहिली पसंतीदेखील मिळू लागली आहे. हा केवळ चवीचा प्रश्न नाही, तर आरोग्याचाही मुद्दा आहे, ही बाब आता समाजास पटली आहे. भारताच्या आग्रहावरून संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय मिलेट (मिश्रधान्य) वर्ष' म्हणून घोषित केल्याने या धान्यास आता जागतिक प्रतिष्ठादेखील मिळाली असून सर्वाधिक बहुपौष्टिकता असलेल्या धान्यांचा दर्जाही त्यास दिला गेला आहे. भारताच्या खाद्यसंस्कृतीला प्रतिष्ठा देण्याच्या केंद्र सरकारच्या या प्रयत्नांची यशस्वी फळे आता दिसू लागली आहेत, त्यामुळे त्याची दखल घ्यायला हवी.**

# सोमनाथ पर्व : भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक

भारतीय संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.



१७८३मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे.

आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. "सोम" म्हणजे चंद्र आणि "नाथ" म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्त्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे.

अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

**-माधुरी मिसाळ,**
**राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य**

## बदलते तंत्रज्ञान

# फोनच्या 'या' सेटिंग्ज बदलल्या तर डेटाची होईल बचत

आपण अनेकदा आपला मोबाईल डेटा वापरत असताना काही वेळानंतर बंद करायचा विसरतो त्यानंतर मग अनेकदा आपला डेटा सुरु असल्यामुळे दिवसभरामध्ये मिळणारा डेटा आपला संपतो. त्यामुळे अनेकदा आपल्याला डेटा संपल्यानंतर अतिरिक्त डेटा रिचार्ज करण्याची वेळ येते. असे आपल्यासोबत अनेकदा होते किंवा हायस्पीड असल्यामुळेदेखील तुम्हाला दिवसभरामध्ये मिळत असलेला डेटा आपल्याला मिळत नाही. जर तुमचाही रिचार्ज सातत्याने संपत असेल तर मग आता तुमच्यासाठी आम्ही एक सोल्युशन आणले आहे. त्यामुळे आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही.



अनेकदा आपले गुगलचे अनेक अपडेट्स सुरुच असतात, त्यामुळे आपला डेटा किंवा वाय-फाय मिळाल्यानंतर मोबाईलमधील ॲप्स ऑटोमॅटीक अपडेट व्हायला सुरुवात होते. हे बंद करण्यासाठी काही स्टेप्स फोलो कराव्या लागणार आहेत. हे ॲप्स अपडेट करण्याची झंझट राहणार नाही, त्याचबरोबर तुमचा रोजचा वाया जात असलेला डेटा देखील साठून राहिल. डेटा सेव्ह ठेवण्यासाठी प्ले-स्टोअरच्या सेटिंग्जमध्ये तुम्हाला जावे लागेल, यामध्ये तुम्हाला नेटवर्क प्रेफरन्सेसवर तुम्हाला तेथे ऑन/ऑफ बटन असेल ते करावे लागणार आहे.


दिवसभरामध्ये आपल्याला वेगवेगळे आपले जवळचे किंवा आपल्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर अनेक फोटो, व्हिडिओ किंवा मीम्स दिवसभरामध्ये अनेकजण शेअर करतात. जर तुमच्या फोनमध्ये मीडिया ऑटो-डाउनलोड हा फिचर सुरु असेल तर तुमचा डेटा हा जास्त वेळ टिकून राहणार नाही. हा फिचर जर तुमचा सुरु असेल तर तुमचे येणार व्हॉट्सअॅपवरील फोटो आणि व्हिडिओ आपोआप डाउनलोड होतील, त्यामुळे हा ऑप्शन बंद करुन ठेवावा.

आपण वापरत असलेल्या मोबाईलमध्ये डेटा सेव्हर पर्याय हा असतो, हा ऑफ्शन आपल्या मोबाईलमध्ये इंटरनेटचा अनावश्यकपणे खर्च होण्यापासून वाचवण्यास मदत होते. मोबाईलमध्ये जर हा ऑप्शन चालू ठेवला तर बॅकग्राऊंडमध्ये चालणाऱ्या ॲप्सचा डेटा ऑटोमॅटीक चालू राहणे बंद होते.

अँड्रॉइड फोन किंवा आयफोन आपण चालवतो, यावेळी आपण अनेकदा एकाचवेळी अनेक ॲप्स वापरतो, त्यामुळे एकावेळी अनेक ॲप्समध्ये डेटा आपला जात असतो. हे बंद करण्यासाठी डिव्हाइसच्या सेटिंग्जमध्ये जाऊन आपल्याला आवश्यक नसतील त्या ॲप्सचे 'बॅकग्राउंड डेटा ऍक्सेस' बंद केल्यास तुमचा डेटा सेव्ह होऊ शकतो.

# संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे

## निमित्त



अमरावती येथे २३ मे १८९६ रोजी संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे यांचा जन्म झाला. मराठी व शास्त्रीय संगीत समीक्षा केशवराव भोळे यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. मराठी भावसंगीताचे जनक, नाट्यसंगीत विचाराला योग्य दिशा देणारे व्यक्तिमत्त्व अशीही केशवरावांची ख्याती होती.

केशवराव भोळे यांचे वडीलही संगीताचे शौकीन होते. ते स्वतः सतारही वाजवत असत. केशवरावांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांचे वडील वारले. तथापि, घरातील संगीतमय वातावरणामुळे केशवरावांना लहानपणापासूनच नाटक-संगीतादी पाहण्या-ऐकण्याचा नाद लागला आणि तो वाढत जाऊन अखेरपर्यंत टिकला. वैद्यकीय अभ्यासासाठी ते मुंबईस आल्यावर या नादाला खोली आणि चौरसपणा येऊन तो इतका वाढला, की त्यांनी वैद्यकीय अभ्यासावर पाणी सोडले. ह्याच सुमारास त्यांचा दुर्गा केळेकर (विवाहोत्तर ज्योत्स्ना भोळे) यांच्याशी विवाह झाला.

ज्योत्स्ना भोळे यांनीही कालांतराने संगीत-नाटकाच्या क्षेत्रांत चांगला नावलौकिक संपादन केला. जुलै १९३३मध्ये 'नाट्यमन्वंतर' या संस्थेच्या आंधळ्यांची शाळा या श्री. वि. वर्तकलिखित प्रसिद्ध नाटकामध्ये त्यांनी केलेले पहिलेच बिंबाचे (नायिका) काम अतिशय गाजले. केशवरावांचाही 'नाट्यमन्वंतरा'शी संबंध जडला. 'आंधळ्यांची शाळा'मध्ये ज्योत्स्नाबाईंनी गायलेल्या दोन गाण्यांची भावपूर्ण स्वररचना केशवरावांनीच केली होती. ह्या सर्वांमुळे केशवराव संगीताचे नवरचनाकार म्हणून प्रसिद्धीस आले. १९३३ साली गोविंदराव टेंबे ह्यांच्या नंतर केशवरावांनी 'प्रभात' ह्या सिनेमा कंपनीत संगीतदिग्दर्शक म्हणून प्रवेश केला.


'प्रभात' कालखंडात केशवरावांची स्वररचनाकाराची वृत्ती फुलून आली. हा बहर अमृतमंथन, संत तुकाराम, कुंकू, माझा मुलगा, संत ज्ञानेश्वर, संत सखू, चंद्रसेना इत्यादी बोलपटांमधील गीतांच्या त्यांनी केलेल्या स्वररचनांमध्ये आणि संगीताच्या दिग्दर्शनामध्ये भरपूर दिसून येतो. त्याखेरीज कित्येक सुट्या भावगीतांनाही त्यांनी चाली लाविल्या. हा प्रामुख्याने त्यांचा निर्मितिकाल मानता येईल.

पुढे ते आकाशवाणी मुंबई केंद्राच्या संगीत विभागाचे प्रमुख झाले. 'एकलव्य' ह्या टोपणनावाने केशवराव भोळे ह्यांनी वसुंधरा या साप्ताहिकात लिहिलेले अभिजात गायक-गायिकांविषयीचे अनेक लेख त्यांच्या रमणीय शैलीमुळे आणि माहितगारीमुळे विख्यात झाले. तेच लेख पुढे आजचे प्रसिद्ध गायक (१९३३) या पुस्तकात संग्रहित करण्यात आले. या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ती म्हणजे संगीताचे मानकरी (१९४९) होय.

केशवराव भोळे यांनी नंतर 'शुद्ध सारंग' याही टोपण नावाने लेख लिहिले. त्यांत त्याची चिकित्सावृत्ती, परखडपणा, बोचरेपणा इत्यादी गुण विशेष दिसून येतात. आवाजाची दुनिया, अस्ताई, वसंतकाकाची पत्रे, माझे संगीत, अंतरा आणि जे आठवते ते हे आठवणीवजा आत्मचरित्रसुद्धा त्यांनी लिहिले. केशवराव भोळे यांचे ९ नोव्हेंबर १९७७ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सावधान! डोकेदुखीकडे दुर्लक्ष करू नका...

आजच्या धकाधकीच्या आयुष्यात डोकेदुखीसाठी अनेकदा तणाव, अपुरी झोप, स्क्रीनचा अतिवापर किंवा कामाचा ताण हे जबाबदार असल्याचं म्हटलं जातं. अर्थात, या सर्व गोष्टींमुळे डोकेदुखी होऊ शकते, परंतु प्रत्येक वेळी असंच असेल असं नाही. तज्ज्ञांच्या मते, सतत होणाऱ्या किंवा असामान्य डोकेदुखीकडे कधीही दुर्लक्ष करू नये, कारण काही प्रकरणांमध्ये हे 'ब्रेन ट्यूमर'चे संकेत असू शकतात. नॉर्मल डोकेदुखी आणि ब्रेन ट्यूमरमुळे होणारी डोकेदुखी यामध्ये काय फरक असतो हे जाणून घेऊया.



न्यूरोसर्जनने दिलेल्या माहितीनुसार ब्रेन ट्यूमरमुळे होणारी डोकेदुखी ही सामान्य डोकेदुखीपेक्षा वेगळी असते. ही डोकेदुखी हळूहळू वाढू शकते आणि वारंवार होते. विशेषतः, सकाळी उठल्यानंतर ही वेदना अत्यंत तीव्र जाणवते. अनेक रुग्णांना डोकेदुखीसोबतच उलट्या होणं, अंधुक दिसणं, चालताना शरीराचा समतोल बिघडणे, फीट येणं, हात-पायांमध्ये अशक्तपणा जाणवणं किंवा गोष्टी लक्षात ठेवण्यास त्रास होणं अशा समस्या उद्भवू शकतात. ब्रेन ट्यूमर कोणत्याही वयोगटातील लोकांना प्रभावित करू शकतो आणि त्यावर योग्य उपचारांसाठी याचं वेळेत निदान होणं अत्यंत आवश्यक आहे.

यातील एक मोठी अडचण अशी आहे की, सुरुवातीच्या काळात याची लक्षणं सहज समजत नाहीत. अनेकदा लोक याला तणाव, मायग्रेन, सायनस किंवा थकवा समजून दुर्लक्ष करतात, ज्यामुळे आजार ओळखण्यात उशीर होतो. डॉक्टर सल्ला देतात की, जर डोकेदुखी अनेक आठवडे सतत राहत असेल, डोकेदुखीमुळे रात्री झोपेतून जाग येत असेल, वारंवार उलट्या होत असतील, दृष्टीमध्ये अचानक बदल झाला असेल किंवा मज्जासंस्थेशी संबंधित काही बदल जाणवत असतील, तर त्वरित तपासणी करून घ्यावी. एमआरआय स्कॅनसारख्या इमेजिंग चाचण्यांमुळे सुरुवातीच्या टप्प्यातच हा आजार ओळखण्यास मदत होते.

गेल्या काही वर्षांत ब्रेन ट्यूमरच्या उपचारांचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. ट्यूमरचा प्रकार, त्याचा आकार आणि तो मेंदूत कोणत्या ठिकाणी आहे यावर त्याचे उपचार अवलंबून असतात. यामध्ये प्रामुख्याने सर्जरी केली जाते, परंतु याशिवाय रेडिओसर्जरी, रेडिएशन थेरपी, केमोथेरपी, टार्गेटेड थेरपी किंवा इतर प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने यावर उपचार केले जाऊ शकतात. त्यामुळे या आजाराला घाबरून जाण्याची गरज नाही. जर तुम्हाला वारंवार डोकेदुखीचा त्रास होत असेल, तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका.

# पावसामुळे कर्जतकरांना उकाड्यापासून दिलासा



**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या चार – पाच दिवसांपासून तापमानात वाढ होत असल्याने उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकारांना शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास पडलेल्या पावसाने दिलासा दिला. हवेत गारवा आल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

गेल्या आठवड्यापासून तापमातात लक्षणीय वाढ झाल्याने दिवस व रात्र नागरिक उकडयाने हैराण झाले होते. त्यातच ऐन झोपेच्या वेळी रात्री कधीही विज पुरवठा खंडित होत असल्याने कर्जतकरांच्या झोपेचे खोबरे झाले होते. आज सकाळपासून उकड्यामुळे सर्वजण हैराण झाले होते. दुपारी तर अंगाची लाही – लाही होत होती. मात्र सहाच्या सुमारास पावसाने सुरुवात केली. त्यातच वाराही सुटला. त्यामुळे उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकारांना थोडासा दिलासा मिळाला. हा पाऊस सुमारे पाऊण तास पडत होता. वारा सुटल्याने वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. तरीही थोड्याशा गरव्याने दिलासा मिळाला.



**मुरूड : निळ्याशार आकाशात काळे ढग दाटून आले होते. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेनंतर हवामान बदलून काळे ढग दाटून येऊन पाऊस पडू लागला. छायाचित्रकार संजय करडे यांनी आगरदांडा घाटमार्गावरील हे मनमोहक दृश्य टिपले आहे.**

## रायगड जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलका पाऊस; हवामान विभागाचा अंदाज

**पाली : प्रतिनिधी**



कडक उन्हाळा आणि वाढत्या उकाड्याने हैराण झालेल्या रायगडवासीयांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. भारतीय हवामान विभागाच्या (IMD) मुंबई प्रादेशिक केंद्राने जाहीर केलेल्या ताज्या अंदाजानुसार, रायगड जिल्ह्यात मंगळवार (ता.१९) ते शनिवार (ता.२३) या कालावधीत हलका पाऊस आणि मेघगर्जनेसह सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवार (ता. २३) जिल्ह्यात हवामान अंशतः ढगाळ राहील आणि दुपारनंतर किंवा संध्याकाळच्या वेळी विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडू शकतो. मे महिन्याच्या उत्तरार्धात होणाऱ्या या पावसामुळे तापमानात घट होऊन नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाची काळजी घ्यावी, असे आवाहनही प्रशासनाकडून केले जात आहे.

ऐन उन्हाळ्यात मान्सूनपूर्व घडामोडींमुळे हवामानात हा बदल होत असून, नागरिकांनी विजा चमकत असताना सुरक्षितस्थळी आश्रय घ्यावा, असे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे.

## 'टाटा स्टील'जवळ गॅस लिकेजचा संदेश देऊन मॉक ड्रिलचे आयोजन

**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांमधील समन्वयाची चाचणी घेण्यासाठी खालापूर तालुक्यात प्रशिक्षण शिबिर आणि मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले. रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या आदेशानुसार खालापूर तहसीलदार कार्यालयात हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रशिक्षण शिबिरामध्ये महसूल कर्मचारी, पोलीस कर्मचारी, नागरिक तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सदस्यांना मान्सूनपूर्व तयारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याच अनुषंगाने आपत्कालीन परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी मॉक ड्रिलही घेण्यात आले.रायगड जिल्हा आपदा मित्र यंत्रणेचे नोडल अधिकारी एम. के. म्हात्रे यांनी प्रशिक्षकाची भूमिका पार पाडत आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील विविध बाबींवर मार्गदर्शन केले. दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास खालापूर तालुक्यातील टाटा स्टील कंपनी परिसरात गॅस लिकेज झाल्याचा अलर्ट संदेश देण्यात आला. त्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि जवान आवश्यक संसाधनांसह टाटा स्टील कंपनीच्या गेट क्रमांक एकजवळ दाखल झाले.

आपत्कालीन यंत्रणांची तत्परता, समन्वय आणि प्रतिसाद क्षमतेची चाचणी घेण्यासाठी ही मॉक ड्रिल आयोजित करण्यात आल्याचे नोडल अधिकारी एम. के. म्हात्रे आणि श्रीकांत शिरसाठ यांनी सांगितले. यावेळी नागरिकांना आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाची काळजी, सुरक्षितता उपाय आणि प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करण्याबाबत माहिती देण्यात आली.



# तळ्यातील डम्पिंग ग्राउंड प्रदूषणाच्या विळख्यात

## परिसरात दुर्गंधी, जनावरांचे आरोग्यही धोक्यात

**तळा : प्रतिनिधी**

तळ्यातील डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सुटता सुटत नसल्याचे चित्र पहायला मिळत असून कित्येक वर्षांपासून डम्पिंगचे स्थलांतर होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र डम्पिंग ग्राऊंड स्थलांतर अडले तरी कोठे असा प्रश्न आता शहरातील नागरिकांकडून विचारला जात आहे.

तळा नगरपंचायतीने डम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था मालकीच्या तळा धरणाजवळ केली आहे. शहरातील सर्व गोळा केलेला ओला व सुका कचरा एकत्रित या ठिकाणी टाकला जातो. मात्र या डम्पिंग ग्राऊंड सभोवती संरक्षक भिंत न बांधल्यामुळे मोकाट गुरे, कुत्रे व पक्षांनी अन्नाच्या शोधात येथे येत असतात.व हवेबरोबर तो पसरला जात आहे. तसेच प्लास्टिकमधे टाकलेले उरलेले अन्न खाताना ही जनावरे प्लास्टिकही गिळतात त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. हे प्लास्टिक गुरांच्या पोटात जावून गुरांच्याही जीवीतास धोका निर्माण होत आहे.ओला सुका कचरा यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते जवळच तहसिल कार्यालय असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच डम्पिंग ग्राऊंड शेजारीच निम्म्या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बोअरवेल खोदण्यात आली आहे.त्या बोअरवेल द्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर टाकलेला हा कचरा कुजून घाण पाणी जमिनीत मुरले जात आहे. त्यामुळे याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याचा संभव असून रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर शहरातील नगरपंचायतीच्या मालकी हक्क असलेल्या जागेत होणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगितले गेले होते. त्यानुसार त्या ठिकाणी कामही पूर्ण करण्यात आले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **श्री. धर्मेश दिनकर राव** यांच्याकडून त्यांच्या लाभांत मे. सिडकोने त्यांच्याकडील २२.५ टक्के योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचे हस्तांतरण करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भुखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक नोड, ता. पनवेल, जि. रायगड | ६७ | २७ | ३७० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडाचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी तो निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडावर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–यांकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा **(१५) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसेच जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भुखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करतील य्याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/–**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल– tahasil.khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ५६/२०२६

१) श्री. गोपाळ चंदर कर्णुक
रा. बिडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड } वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म–मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत बिडखुर्द, ता. खालापूर, जि. रायगड } प्रतिवादी

**विषयः– जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. गोपाळ चंदर कर्णुक, रा. बिडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांची आत्या कै. राधाबाई रामजी घरत यांचा मृत्यू दिनांक १/१०/१९७८ रोजी बिडखुर्द, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. १८/०५/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्कयानिशी दिली असे.

**ठिकाण :– खालापूर**
**दिनांकः– २२/५/२०२६**

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**

# पनवेल महानगरपालिका

## तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड

## पाणी पुरवठा विभाग

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ या संस्थेकडून उन्हाळा कालावधीत कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रिक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची पाण्याची गरज भागविण्यात येते. त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला आहे, ही वस्तूस्थिती विचारात घेता **सोमवार दि.२५/०५/२०२६** रोजी पासून पनवेल शहरामध्ये जलकुंभ निहाय देहरंग धरणात पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध होईपर्यंत एक भाग आठवडयातून एक दिवस बंद ठेवणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | दिवस | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणीपुरवठा बंद राहणारा भाग | पाणीपुरवठा सुरु राहणाऱ्या भागाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | **शुक्रवार** | गोल टाकी (WTP) | मिडल क्लास हो. सोसा भाग -१ व २, एस के बजाज भाग बंद राहिल | -- |
| २ | **शनिवार** | गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | तक्का गाव व कॉलनी भाग बंद राहील. | -- |
| ३ | **रविवार** | --- | **शहरातील सर्व भागात पाणीपुरवठा सुरू राहील.** | **शहरातील सर्व भागात पाणीपुरवठा सुरू राहील.** |
| ४ | **सोमवार** | १.मार्केटयार्ड उंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील | -- |
| | | २.भाजी मार्केट उंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील | |
| | | ३.चौकोनी टाकी (WTP) | १.पटेल पार्क, जैन मंदीर, गणपती मंदीर २. मामलेदार कचेरी ते दत्तराज सो. ३. साठेगल्ली ते विरुपाक्ष मंदीर,४. सिटी स्टोअर,५. सिनीयर ज्यूनियर गल्ली, ६.आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल, ७.गायकर गल्ली बैठी घरे, ८.शुभलाभ सो. ते सहयोग नगर,९.सुतिका गृह ते यशोमंगल सो.,१० उमाशंकर सो. ते यशोवर्धन सो., ११.आदर्श हॉटेल ते रत्नेश सो.,१२. कुबेर सो. ते शुभलाभ सो., १३.धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथ नगर, १४.मुनोथनगर ई विंग, १५प्रिन्स पॅराडाईज सो. १६.सनराईज सो, १७.जोशी आळी इत्यादी. ३) पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदीर, लक्ष्मी वसाहत. | १.माणिक नगर,अशोका गार्डन, केशवबाग, स्नेहसदन सो., यशोदिप, शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकरवाडा, गुढेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत, घाटे आळी, गावदेवी पाडा, परदेशी आळी, गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्री लॉज पर्यंत, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल ते खुटकर मटण शॉप इत्यादी. २.दांडेकर हॉस्पिटल ते श्री. अच्युत मनोरे घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल, परदेशी आळी बैठी घरे, रत्ना रेसिडेन्सी,अष्टविनायक कॉलनी, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, ३.श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, यशोपुरम सो., जुना पोस्ट बाजू, मुनोथ नगर A,B विंग. ४.जयभारत नाका ते भिडे घरापर्यंत, गांगल वाडा, महाड बँक. आदर्श हॉटेल ते जयभारत नाका, गोडसे आळी, विरुपाक्ष मंदीर ते दगडी शाळा, मनिष मार्केट, अन्नपुर्णा ते निसर्ग बिल्डींग, त्रिमुर्ती सहनिवास, कापड बाजार, गोखले हॉल ते प्रज्ञा सो., रतन टॉकीज परिसर इत्यादी. |
| ५ | **मंगळवार** | १.पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील. | -- |
| | | २.पायोनिअर उंच जलकुंभ | पायोनिअर सोसायटी जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा व ठाणा रोड बंद राहील. | |
| | | ३.चौकोनी टाकी (WTP) | १.माणिक नगर,अशोका गार्डन, केशवबाग, स्नेहसदन सो., यशोदिप, शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकरवाडा, गुढेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत, घाटे आळी, गावदेवी पाडा, परदेशी आळी, गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्री लॉज पर्यंत, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल ते खुटकर मटण शॉप इत्यादी. २.दांडेकर हॉस्पिटल ते श्री. अच्युत मनोरे घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल, परदेशी आळी बैठी घरे, रत्ना रेसिडेन्सी,अष्टविनायक कॉलनी, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, ३.श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, यशोपुरम सो., जुना पोस्ट बाजू, मुनोथ नगर A,B विंग. ४.जयभारत नाका ते भिडे घरापर्यंत, गांगल वाडा, महाड बँक. आदर्श हॉटेल ते जयभारत नाका, गोडसे आळी, विरुपाक्ष मंदीर ते दगडी शाळा, मनिष मार्केट, अन्नपुर्णा ते निसर्ग बिल्डींग, त्रिमुर्ती सहनिवास, कापड बाजार, गोखले हॉल ते प्रज्ञा सो., रतन टॉकीज परिसर इत्यादी. | १.पटेल पार्क, जैन मंदीर, गणपती मंदीर २. मामलेदार कचेरी ते दत्तराज सो. ३. साठेगल्ली ते विरुपाक्ष मंदीर,४. सिटी स्टोअर,५. सिनीयर ज्यूनियर गल्ली, ६. आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल, ७.गायकर गल्ली बैठी घरे, ८.शुभलाभ सो. ते सहयोग नगर,९.सुतिका गृह ते यशोमंगल सो.,१० उमाशंकर सो. ते यशोवर्धन सो., ११.आदर्श हॉटेल ते रत्नेश सो.,१२. कुबेर सो. ते शुभलाभ सो., १३.धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथ नगर, १४.मुनोथनगर ई विंग, १५प्रिन्स पॅराडाईज सो. १६.सनराईज सो, १७.जोशी आळी इत्यादी. ३) पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदीर, लक्ष्मी वसाहत. |
| ६ | **बुधवार** | एच.ओ.सी. उंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील. (एच.ओ.सी. कॉलनीसह छोटा खांदा व मोठा खांदा) | -- |
| ७ | **गुरुवार** | ठाणा नाका उंच जलकुंभ् | संपुर्ण साईनगर भाग बंद राहील. | -- |

**टिप :– उपरोक्त प्रमाणे उपलब्ध पाणी पुरवठयानुसार पाणी वितरणाच्या वेळेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येईल.**

**सही/–**
**(संजय कटेकर)**
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२६/प्र.क्र.१४७/१५८/२०२६**
**दिनांक : २२/०५/२०२६**

# बेलापूर ओएनजीसी वसाहतीची दुरवस्था

## पुनर्बांधणीसाठी आमदार मंदा म्हात्रे यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीबीडी बेलापूर सेक्टर-१ येथील ओएनजीसीच्या निवासी वसाहतीची अवस्था दिवसेंदिवस अधिकच जीर्ण होत असल्याने या जागेच्या पुनर्बांधणीसाठी आणि सार्वजनिक हिताच्या वापरासाठी राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथे निवेदन सादर करण्यात आले आहे.

.सीबीडी बेलापूर सेक्टर-१ मधील ओएनजीसीचे निवासी संकुल अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असून त्या परिसरातील इमारती भग्न, ओसाड आणि धोकादायक स्थितीत उभ्या आहेत. वाढलेली झाडे-झुडपे, साचलेला कचरा आणि मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे संपूर्ण परिसर असुरक्षित बनला असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. नवी मुंबईसारख्या नियोजित शहराच्या मध्यवर्ती भागात अशी दुर्लक्षित जागा राहणे ही गंभीर बाब असल्याचे ही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सदर परिसरात अंधार, निर्जन वातावरण आणि अस्वच्छता वाढल्याने कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या जागेची तातडीने पाहणी करून सुरक्षा उपाययोजना कराव्यात, या भूखंडाचा उपयोग पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी करण्यात यावा. नवी मुंबई परिसरात अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि शिपाई वर्षानुवर्षे अपुऱ्या व जीर्ण निवासस्थानी राहत असल्याने त्यांच्यासाठी सुसज्ज घरे उभारण्याची आवश्यकता आहे. यासाठी यापूर्वीही प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

याशिवाय, नवी मुंबईमध्ये वाढती लोकसंख्या, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनीची गरज निर्माण होत असताना एवढा मोठा भूखंड निष्क्रिय राहणे अयोग्य असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. योग्य नियोजनाद्वारे या जागेचा नागरिकाभिमुख विकासासाठी प्रभावी वापर होऊ शकतो, असे मत आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केले आले.

त्यामुळे संबंधित जमीन वाटपाच्या अटींचा पुनर्विचार करून ही जागा राज्य शासनाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ओएनजीसी, सिडको व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त पाहणीद्वारे सद्यस्थितीचे मूल्यांकन करण्यात यावे, अशीही सूचना करण्यात आली आहे.

जर ओएनजीसीला सदर जमिनीची आवश्यकता उरलेली नसेल, तर त्या जागेवर पोलीस निवासस्थान, आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था किंवा इतर सार्वजनिक प्रकल्प उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. मंदा म्हात्रे यांनी निवेदनातून केली आहे. स्थानिक स्तरावर या मागणीला नागरिकांकडूनही पाठिंबा मिळत असून, शासन याबाबत काय भूमिका घेते याकडे आता नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

# नवी मुंबई महापालिकेच्या पथकाची पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागास अभ्यास भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका (एनएमएमसी) येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने नुकतीच पनवेल महानगरपालिकेस अभ्यास भेट दिली. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी उपस्थितांना माहिती दिली.

या पथकामध्ये सहाय्यक आयुक्त अलका महापूरकर, वरिष्ठ लि पिक/कर निरीक्षक राकेश आंबेकर, वरिष्ठ लिपिक/कर निरीक्षक अभिजीत वसावे, मेसर्स प्रोबेटी संस्थेचे अधिकारी ओम महाजन तसेच मेसर्स फॉक्सबेरी संस्थेचे अधिकारी राहुल नाईक यांचा समावेश होता.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागात विविध कार्यप्रणाली, कर आकारणी प्रक्रिया, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन पद्धती, कर वसुली व्यवस्थापन तसेच डिजिटल प्रणाली राबविली जात आहे. याबाबत नवी मुंबई महानगरपालिका पथकास यावेळी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच मे स्थापत्य कन्सल्टन्सीचे सत्यम व श्रीतेज म्हात्रे यांनी तांत्रिक बाबींविषयी माहिती दिली.

यावेळी पमपाच्या मालमत्ता कर विभागातील अधिकाऱ्यांनी विविध विषयांवर सादरीकरण करून माहिती दिली. यामध्ये मालमत्ता कर आकारणी व अंमलबजावणी प्रक्रिया, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन कार्यपद्धती, मालमत्ता महसूल वाढीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम, लेटिंग रेट/ अन्युअल लेटिंग व्हॅल्यू निश्चिती प्रक्रिया, थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम व डिजिटल उपक्रम, जीआयएस आधारित सर्वेक्षण व तंत्रज्ञानाचा वापर तसेच नागरिक जनजागृती मोहिमा व कर वसुली सुधारणा उपाययोजना या विषयांचा समावेश होता या अभ्यास भेटीद्वारे दोन्ही महानगरपालिकांमध्ये प्रशासकीय अनुभव व कार्यपद्धतीची देवाणघेवाण होऊन भविष्यातील कामकाज अधिक सक्षम, परिणामकारक व नागरिकाभिमुख होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त केला.

# नवी मुंबईत मूषक नियंत्रण कर्मचाऱ्यांचा पगार रखडला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

> *निवडणूक आचारसंहितेमुळे कर्मचाऱ्यांच्या पगार वितरणास विलंब झाला होता. मात्र, संबंधित विषयाला प्राधान्य देत आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून पहिल्या टप्प्यातील रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरित प्रलंबित रक्कम देखील आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून येत्या मंगळवारपर्यंत संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येईल.*
> – **डॉ. राजेश म्हात्रे,** मुख्य वैद्यकीय अधिकारी

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मूषक नियंत्रण विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याचा पगार अद्याप मिळालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मे महिन्याची २२ तारीख उलटून गेली तरी पूर्ण वेतन न मिळाल्याने अनेक कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. २१ मे रोजी सायंकाळी काही कर्मचाऱ्यांच्या खात्यात केवळ १० हजार रुपये जमा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते संदीप खांडगेपाटील यांनी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. तसेच या विलंबा मागील जबाबदारी निश्चित करून चौकशी करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

नवी मुंबई शहरातील उंदीर नियंत्रण आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापनासाठी महापालिकेचा मूषक नियंत्रण विभाग कार्यरत आहे. संबंधित कामाचा ठेका संपून तब्बल तीन महिने उलटले असतानाही नव्या ठेक्याची प्रक्रिया पूर्णत्वास गेलेली नाही.

महासभेत मंजुरी मिळूनही अद्याप संबंधित ठेकेदाराच्या हाती अधिकृत वर्क ऑर्डर पोहोचलेली नसल्याचे उघड झाले आहे.परिणामी ,वेतन वितरण प्रक्रियेलाही मोठा फटका बसला आहे.

पगार रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांना घरभाडे, मुलांच्या शाळा-ॲडमिशनची फी, प्रवास खर्च, गावाकडील जबाबदाऱ्या तसेच लग्नसमारंभ यांसारख्या गरजांसाठी कर्ज काढण्याची वेळ आली आहे.

महापालिकेतील कायम कर्मचारी, अधिकारी, कंत्राटी कर्मचारी आणि ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होते; मात्र मूषक नियंत्रण कर्मचाऱ्यांनाच वारंवार आर्थिक हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. अशी भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

# तारण ठेवलेले ५५ लाखांचे सोने लुबाडले

## ■ उरणमध्ये मारुती ज्वेलर्सच्या मालकांसह तिघांवर गुन्हा दाखल

**उरण : रामप्रहर वृत्त**

सोने तारण ठेवून घेतलेले लाखो रुपयांचे दागिने परत न करता तब्बल ५५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकारक उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी मारुती ज्वेलर्सचे मालक नथुसिंग चंदना, त्यांचे वडील भेरूनाथ चंदना आणि त्यांचे व्यावसायिक मित्र निलेश मेहता यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे.

उरणमधील गणेश नगर भागात राहणारे आणि आयुश कंस्ट्रक्शन नावाने सिव्हील कामे करणारे व्यावसायिक युवराज प्रताप पाटील (वय ४२) यांनी ही तक्रार दाखल केली आहे. कामासाठी पैशांची आवश्यकता असल्याने पाटील यांनी १ फेब्रुवारी २०२२ ते २९ मार्च २०२३ या कालावधीत उरण येथील मारुती ज्वेलर्समध्ये विश्वासाने एकूण ५९५.२० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तारण ठेवले होते. त्याबदल्यात त्यांनी टप्प्याटप्प्याने एकूण १७,३५,००० रुपये उचलले होते.

नोव्हेंबर २०२३ मध्ये जेव्हा पाटील यांनी व्याजासह पैसे परत करून आपले दागिने मागितले, तेव्हा नथुसिंगने दागिने निलेश मेहता यांच्याकडे असल्याचे सांगितले. त्यानंतर "निलेश मेहता यांच्या आईचे निधन झाले असून दागिने बँकेच्या लॉकरमध्ये अडकले आहेत, वारस दाखल्याशिवाय ते मिळणार नाहीत" अशी वेगवेगळी बहाणेबाजी करून वेळ मारून नेण्यात आली.

फेब्रुवारी २०२५ मध्ये पाटील यांच्या घरात लग्न असल्याने त्यांनी दागिन्यांसाठी तगादा लावला. त्यानंतर झालेल्या एका बैठकीत आरोपी निलेश मेहता याने पाटील यांच्याकडून मूळ पावत्या स्वतःकडे घेतल्या आणि आणखी ५ लाख रुपयांची मागणी केली. ५ लाख रुपये दिल्यास ३० तोळे सोने बनवून देतो, असे आश्वासन त्याने दिले होते. मात्र, त्याने ३० तोळ्यांऐवजी केवळ १० तोळ्यांचे (१०० ग्रॅम) दागिने परत केले आणि उर्वरित दागिने देण्यास टाळाटाळ केली.

अनेक महिने उलटूनही उर्वरित ४९५.२० ग्रॅम सोने परत न मिळाल्याने आणि आरोपी कोणताही प्रतिसाद न देता थेट राजस्थान येथे निघून गेल्याने आपली फसवणूक झाल्याचे पाटील यांच्या लक्षात आले. तिन्ही आरोपींनी संगणमत करून आपली सुमारे ५५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी उरण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश गोरे करत आहेत.

# उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता मार्गदर्शक सूचना जारी

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतातील अनेक राज्यांच्या आपत्ती व्यवस्थापन आराखडयात उष्णतेच्या लाटांना अधिसूचित आपत्ती म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे देखील उष्णतेचा धोका असणारे देशातील टॉप टेन मधील संवेदनशील राज्य आहे. त्यामुळे नवी मुंबई कार्यक्षेत्रात सदयस्थितीत वाढत्या तापमानामुळे आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने महापालिका आयु डॉ.कैलास शिंदे यांनी उष्माघात व उष्णताजन्य आजार टाळण्यासाठी नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता मार्गदर्शक सूचनांचे पालन करणारे परिपत्रक जारी केले आहे.

या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये क्षेत्रीय कामकाज करणारे अधिकारी, कर्मचारी यांनी शक्यतो दुपारी १२.०० ते ४.०० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, तसेच क्षेत्रीय कामाकरिता शक्यतो सकाळी ११.०० पूर्वी किवा सायंकाळी ४.०० नंतर बाहेर पडावे असे सूचित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे अत्यावश्यक / आपत्कालीन कामासाठी बाहेर जाणे आवश्यक असल्यास उष्णतेच्या अलर्ट कालावधीत उष्णतेपासून बचावाकरिता योग्य तो काळजी घेऊन बाहेर पडावे असे नमूद करण्यात आले आहे.

याबाबत संबंधित विभागप्रमुख, कार्यालयप्रमुख यांनी विविध विभागांतील क्षेत्रीय स्तरावर कंत्राटी / तात्पुरत्या स्वरुपात काम करणाऱ्या कामगारांची उष्णतेच्या ॲलर्ट कालावधीत योग्य ती काळजी घ्यावी.

सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी पिणे तसेच ओआरएस, लिंबूपाणी, ताक अशा द्रवपदार्थांचे सेवन करावे.हलक्या रंगाचे, सैल व सुती कपडे वापरावेत. बाहेर जाताना टोपी, रुमाल अथवा छत्रीचा वापर करावा.कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यस्थळी अधिकारी, कर्मचारी व अभ्यागत यांच्याकरिता पिण्याच्या थंड पाण्याची व आवश्यक प्राथमिक उपचाराची व्यवस्था उपलब्ध ठेवावी.

उष्माघाताची चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी, जास्त घाम येणे, अशक्तपणा अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा.कोणत्याही अधिकारी, कर्मचारी यांची प्रकृती बिघडल्यास संबंधित विभाग प्रमुखांनी तात्काळ आवश्यक ती उपचार उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# गाडी क्रमांक ११०३२ अलीपूरद्वार जंक्शन पनवेल अमृत भारत एक्सप्रेस (साप्ताहिकच्या) वेळापत्रकात बदल

**नवी मुंबईः रामप्रहर वृत्त**



रेल्वेने गाडी क्रमांक ११०३२ अलीपूरद्वार जंक्शन पनवेल अमृत भारत एक्सप्रेस (साप्ताहिक) च्या वेळापत्रकात बदल अधिसूचित केला आहे. सुधारित वेळापत्रक दिनांक २८.०५.२०२६ ( प्रवास सुरू होण्याची तारीख – JCO) पासून लागू होईल.

सुधारित वेळापत्रकानुसार गाडी क्रमांक ११०३२ ही अलीपूरद्वार जंक्शनवरून पहाटे ०४:४५ ऐवजी पहाटे ०३:४५ वाजता सुटेल.हासिमारा स्थानकावर, गाडी पहाटे ०४:३० वाजता पोहोचेल आणि ०४:३२ वाजता सुटेल, ज्यामुळे पूर्वीच्या ०५:३५ वाजता पोहोचण्याच्या आणि ०५:३७ वाजता सुटण्याच्या वेळा बदलल्या जातील.बिन्नागुरी स्थानकावर, गाडी पहाटे ०५:०५ वाजता पोहोचेल आणि ०५:०७ वाजता सुटेल. यापूर्वी गाडी सकाळी ०६:१० वाजता पोहोचायची आणि ०६:१२ वाजता सुटायची.

प्रवाशांनी सुधारित वेळापत्रकाची नोंद घ्यावी आणि त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे.प्रवासी तिकीट बुकिंगसाठी RailOne ॲप डाउनलोड करू शकतात.या गाडीच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# ५ ते १४ वयोगटातील मुलांसाठी समर कॅम्पचे आयोजन



**पनवेलः रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे ५ ते १४ वयोगटातील मुलांसाठी २१ मे २०२६ ते २४ मे २०२६ या कालावधीत समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सेक्टर २, न्यू पनवेल येथील इन्फिनिटी फाउंडेशन कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. समर कॅम्पच्या पहिल्या दिवसाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी नितीन साके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, सल्लागार पुराण सिंग, शितल गर्गी, अक्षया चितळे, सहसचिव समृद्धी पोटे, आदिवासी विकास सचिव कार्तिक शर्मा तसेच फाउंडेशनचे इतर सदस्य उपस्थित होते.

कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांसाठी झुंबा, चित्रकला, एकपात्री नाटक, योगा, पब्लिक स्पिकिंग, ब्लॉक प्रिंटिंग आणि डान्स अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी झुंबा प्रशिक्षण आरती भगत यांनी, चित्रकला प्रशिक्षण केविन डायर्स यांनी, तर पब्लिक स्पिकिंगचे प्रशिक्षण प्रिया चौधरी यांनी दिले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होण्यासोबतच सर्जनशीलता, संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत आहे.

यावेळी आयुफ अकुला म्हणाले की, मुलांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि सुट्टीचा काळ अर्थपूर्ण पद्धतीने व्यतीत करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. इन्फिनिटी फाउंडेशनच्या माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. या समर कॅम्पला विद्यार्थी आणि पालकांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

## "एस. एस. रामदास बोट की दर्दभरी कहानी"चे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

रविवार दिनांक ७ जून २०२६ रोजी संपन्न होणाऱ्या – ३ –या रंगधनु नवरंग जेष्ठ नागरिक ग्रंथालय साहित्य संमेलन ' मधे गज आनन म्हात्रे लिखित " एस.एस.रामदास बोट की दर्दभरी कहानी" कादंबरी प्रकाशित होणार आहे. ' चक्रीवादळातील श्री संत रामदास बोट ' या मराठी कादंबरीची ही हिंदी आवृत्ती आहे.

जेष्ठ नागरिक भवन, पहिला माळा, सेक्टर १२, नेरूळ पश्चिम, नवीमुंबई येथे हे साहित्य संमेलन पार पडणार आहे. ग्रंथ दिंडी, पुस्तक प्रकाशन, पुरस्कार वितरण, साहित्य चर्चा, कविसंमेलन असा एकदिवसीय भरगच्च कार्यक्रम आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष आहेत प्राचार्य अजित मगदुम. अधिक माहिती लेखक गज-आनन म्हात्रे यांनी दिली.

# वीज समस्या न सुटल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



सानपाडा येथील प्रभाग क्र. १८ मधील वाशीगाव, सेक्टर ३१, ३१ (ए) गावठाण विस्तार योजना परिसर, सानपाडा – सोनखार (पामबीच) व वाशी सेक्टर १७ या विभागातील वीज समस्या महिनाभरात निकाली काढल्यास सत्कार अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा भाजपा नगरसेवक निशांत भगत यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

गेल्या महिन्याभरापासून या परिसरातील नागरिक आणि व्यापा-यांना विविध तांत्रिक कारणांमुळे १२ तासांपेक्षा अधिक तास वीजपुरवठा खंडित होणे, महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे आर्थिक नुकसान आणि खोदकाम व केबल दुरुस्तीच्या कामामुळे नागरिकांना वीजेच्या विविध तांत्रिक समस्यांना सामोरं जावं लागत आहे.

या प्रकरणी नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्यासोबत विद्युत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी २९ एप्रिल रोजी वाशीगाव येथे घेतलेल्या बैठकीनंतरही गेल्या महिन्याभरात परिस्थितीमध्ये कोणतीच सुधारणा झालेली नाही. उन्हाचा पारा वाढत असताना वारंवार सूचना करुनही वीज ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेतली जात नसल्यामुळे या विषयाचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत चालले होते. त्यामुळे अखेर शुक्रवारी महावितरणचे वाशी विभागीय अधिक्षक अभियंता दिपक पाटील यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. या वेळी नगरसेविका प्रिती भगत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर, वितरण मंडळाचे अधिकारी व अभियंते, समाजसेवक संदिप भगत आणि प्रभागातील नागरिक प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आला. यामध्ये प्रभाग क्र. १८ मधील वाशी – सानपाडा विभागातील वीज पुरवठ्यासंबंधित समस्यांबाबतीत महावितरणचे अधिकारी लोकप्रतिनिधिंसह परिसर निहाय संयुक्त सर्वेक्षण करणार आहेत. वीज पुरवठ्या संबंधित कोणत्याही समस्येबाबत माहिती देणे व तक्रारीचे तात्काळ निवारण करण्यासाठी अधिकारी, अभियंते व नागरी प्रतिनिधींमचा व्हॉट्सअप ग्रुप तयार करणे, वाशीगाव परिसरातील एकूण ६ डिपींपैकी कोणत्याही एका डीपी मध्ये बिघाड झाल्यास पर्यायी मार्गाने वीज पुरवठा सुरु रहावा म्हणून या सहाही इंटरलिंकिंग करण्यात येईल, वीज पुरवठा स्थिर व अखंडित राहण्यासाठी आवश्यक आरएमयू (RMU) युनिट बसविण्यात येणार, विभागातील विद्युत पुरवठा करणा–या जुन्या, नादुरुस्त व जॉईंट्स मारलेल्या केबल वाहिन्या बदलणे, ही सर्व कामे महिन्याभराच्या आत पूर्ण करण्याचे ठोस आश्वास महावितरणचे वाशी विभागीय अधिक्षक अभियंता दिपक पाटील यांनी बैठकीत पोलिसां समक्ष नगरसेवक व नागरिकांना दिले.

दरम्यान ,एका महिन्यात जर महावितरणकडून वीज पुरवठा सेवेत सुधार न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचे नगरसेवक निशांत भगत यांनी सांगितले. या विभागाने जे आश्वासन दिले त्या मागण्या वेळेत पूर्ण केल्यास अधिकारी अभियंत्याचा सत्कार करू अशी भूमिका यावेळी भगत यांनी मांडली.

# “रोबोटिक बोयो” ठरतोय खऱ्या अर्थाने जीवनरक्षक!

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव बीच येथे आज पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तींना तात्काळ मदत व बचावकार्य करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या “रोबोटिक बोयो” या आधुनिक जीवरक्षक यंत्राचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या प्रात्यक्षिकाला कोकण विभागीय आयुक्त मा. श्रीमती रुबल अग्रवाल यांनी उपस्थित राहून यंत्रणेची कार्यपद्धती जाणून घेतली व या उपक्रमाचे कौतुक करत “रोबोटिक बोयो खऱ्या अर्थाने जीवनरक्षक ठरत आहे” अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली.



यावेळी नागांव माजी सरपंच श्री. नंदकुमार मयेकर, सरपंच सौ. हर्षदा मयेकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, तहसिलदार विक्रम पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्रशासनातील व ग्रामपंचायत नागांव अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

भेटीदरम्यान विभागीय आयुक्तांनी नागाव बीचवरील पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत, शौचालयांची संख्या वाढविण्याबाबत तसेच पर्यटकांची माहिती संकलित करण्यासाठी प्रभावी व्यवस्था उभारण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या.

सरपंच सौ. हर्षदा मयेकर यांच्या नेतृत्वाखाली नागाव ग्रामपंचायत आणि संपूर्ण ग्रामपंचायत टीम सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून नागावला सुरक्षित, स्वच्छ, आधुनिक आणि पर्यटकांसाठी आदर्श पर्यटनस्थळ बनविण्याच्या दिशेने प्रभावी काम करत आहे. बीच सुरक्षा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, आधुनिक सुविधा आणि पर्यटन विकास यांचा समतोल साधत ग्रामपंचायतने अनेक अभिनव प्रकल्प यशस्वीपणे राबविले आहेत. “रोबोटिक बोयो” सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा नागावच्या पर्यटन विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, प्रशासन आणि ग्रामपंचायत यांच्या समन्वयातून नागाव बीच भविष्यात राज्यातील सर्वात सुरक्षित आणि आकर्षक पर्यटनस्थळांपैकी एक म्हणून निश्चितच आपली वेगळी ओळख निर्माण करेल.

## माणगाव येथील शिष्यवृत्ती परीक्षेत शिपूरकर शाळेचे सुयश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव परिसरातील शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी सुधाकर नारायण शिपूरकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत केली आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५२६ मध्ये शाळेतील सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सुधागर संथिरसेकरन गौडा, ओवी अजित शिंदे, काव्या राजेश चव्हाण, आदित्य अर्जुन पवार, भुजळ भारत वाढवळ, यश संजय पाटील यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, प्रामाणिक मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचा आनंद द्विगुणित झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील योग्य मार्गदर्शन, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश संपादन करू शकतात, हे या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, मुख्याध्यापिकांचे नियोजन तसेच पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. शाळेत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा आणि अभ्यासाचे नियोजनबद्ध प्रशिक्षण देण्यात आले होते. त्याचा सकारात्मक परिणाम या यशातून दिसून आला. शाळा व्यवस्थापन समिती, प्रशासकीय मंडळ, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही असेच उज्ज्वल यश संपादन करून शाळेचे, पालकांचे आणि गावाचे नाव उंचवावे अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधी क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक नौकांना मासेमारी बंदी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ व सुधारणा अध्यादेश, २०२१ अन्वये यावर्षी दि.१ जून ते ३१ जुलै २०२६ (दोन्ही दिवस धरुन ६१ दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधि क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) रायगड-अलिबाग संजय पाटील यांनी केले.

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील.सदर पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि.१ जून २०२६ पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि. ३१ जुलै २०२६ वा त्यापुर्वी सदर नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण मार्गदर्शक सूचना / आदेश लागू राहतील.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास/ केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे.

तरी सर्व मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांनी याची दक्षता घ्यावी.

## धारवली गावात वर्षश्राद्धानिमित्त अनोखा उपक्रम; तांदळेकर बंधूंकडून दोन पार बांधण्याचा शुभारंभ

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील धारवली गावामध्ये सामाजिक बांधीलकी आणि पितृस्मरण यांचा एक आदर्श मेळ पाहायला मिळाला. कैलासवासी सखाराम तांदळेकर यांच्या वर्षश्राद्धानिमित्त त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. सुनील सखाराम तांदळेकर आणि सुजितभाई सखाराम तांदळेकर यांच्या वतीने गावातील होळीच्या जागेवर दोन भव्य पार (ओटे) बांधण्याचे जाहीर करण्यात आले आहे. या लोकउपयोगी कामाचा शुभारंभ नुकताच स्थानिक ग्रामस्थ आणि मुंबईकर बांधवांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला.

आपल्या पूर्वजांच्या स्मृती केवळ धार्मिक विधींपुरत्या मर्यादित न ठेवता, समाजाला आणि गावाला उपयोगी पडेल असे कार्य उभे करावे, या उद्देशाने तांदळेकर कुटुंबीयांनी हा स्तुत्य निर्णय घेतला. गावातील सार्वजनिक उपक्रम, सण-उत्सव आणि ग्रामस्थांना एकत्र बसण्यासाठी हक्काची जागा मिळावी म्हणून होळीवर हे दोन पार बांधण्यात येणार आहेत.

या शुभारंभ प्रसंगी धारवली गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, महिला मंडळ तसेच नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबईत स्थायिक झालेले पण गावच्या मातीशी नाळ जोडून राहिलेले अनेक मुंबईकर बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्षश्राद्धाचे औचित्य साधून तांदळेकर बंधूंनी सामाजिक भान जपत सुरू केलेल्या या विकासकामाचे संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यात आणि विशेषतः धारवली पंचक्रोशीत भरभरून कौतुक होत आहे. 'पूर्वजांच्या स्मरणार्थ असे विधायक काम करणे हा समाजासाठी एक उत्तम पायंडा आहे,' अशा भावना उपस्थित ग्रामस्थांनी या वेळी व्यक्त केल्या.

## हिंदुत्वाच्या विचारावर चालले तर जग टिकेल -अविनाश धर्माधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

जगात हिंसाचार सुरू आहे. जग विनाशाच्या दिशेन जात आहे. हिंदूत्वाच्या विचारानुसार चालेले तर हिंसाचार बंद होईल. सारे जग एक होईल आणि जग टिकेल , असे ठाम प्रतिपादन माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी कैले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सकल हिूद सामाज अलिबाग यांच्यातर्फे गुरूवारी (दि. २१) आयोजित करण्यात आलेल्या हिंदू संमेलनात अविनाश धर्माधिकारी बोलत होते.सकल हिंदू समाज अलिबाग अध्यक्ष समीर दिघे, उपाध्यक्ष सुधीर अग्रावर, उपाध्यक्ष पल्लवी जोशी, दिनेश चव्हाण व डॉ उत्तरा खाडिलकर, रघूजी आंग्रे आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. हे जग एका शक्तीची निर्मिती आहे. हे जाग एक कुटूंब आहे असे हिंदू धर्म सांगतो. वैश्विक आणि विज्ञाननिष्ठ हा हिदुत्वाचा आधार आहे. त्यामुळे हिंदू धर्माच्या तत्वानुसार चालले तर सर्व जग एक होईल. केणी कुणाचा द्वेश करणार नाही. जग पुढे जाईल. ज्याला हिंदूचा अर्थ समजेल त्याला हिंदू असल्याचा अभिमानच वाटेल, असे अविनाश धर्माधिकारी म्हणाले.

भारतात वैविधतेमध्ये एकता आहे. भारत हे पूर्वीपासूनच राष्ट्र होते. येथील अनेक भागात गणराज्य होती. तेथील लोक आपले राजे निवडून देत असत. भारत ही जागातील लोकशाहीची जननी आहे. भारतीय संस्कृतीमध्येच लोकशाही आहे. त्यामुळे भारतात लोकशाही टिकली आहे.





# पोलादपूर तालुक्यात २२ ठिकाणी नद्यांतील गाळउपसा कामाला वेग

## मंत्री गोगावले यांनी कार्यकर्त्यांना दिलेला शब्द केला पूर्ण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गेल्या वर्षी आपत्ती निवारण सामुग्रीची किटस् आणि विविध उपकरणे यांचे वाटप करण्याच्या कार्यक्रमप्रसंगी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार मंत्री भरतशेठ गोगावले यांनी महाड विधानसभा मतदार संघाला गाळ उपशाद्वारे आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी देण्यात आलेल्या २० कोटींच्या निधीचा अधिक वाटा पोलादपूर तालुक्याला देण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार सद्यस्थितीत पोलादपूर तालुक्यात नद्यांतील २२ ठिकाणी ३ लाख १८ हजार ३० घनमीटर गाळउपसा करण्याच्या कामाला वेग आला आहे. यासाठी ९ कंपन्यांना ठेकेदारी देण्यात आली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.





पोलादपूर तालुक्यात एकीकडे रेतीउपसा करणाऱ्यांना रॉयल्टी म्हणजेच स्वामीत्वधन सरकारी तिजोरीत भरण्याची सक्ती असताना गाळ उपशाला प्रतीघनमीटर १०८.५५ रूपयांपासून दर निश्चित करण्यात आला असून २५ हजार घनमीटर गाळउपशाला २७ लाख १३ हजार ७५० रूपये म्हणजे साधारणपणे १ हजार घनमीटर गाळउपशाला १ लाखापेक्षा अधिक मोबदला देण्यात येणार असून याखेरिज गाळ निष्कासन करताना गाळ दुसऱ्या भागात नेऊन टाकण्याची मुभा असल्याने यातही लाखो रूपये प्रति हजारी घनमीटर मिळविण्याची संधी ठेकेदारांना मिळणार आहे.

गाळउपसा कामाच्या प्रगतीचा दर ८ दिवसांनी आढावा घेण्यात येईल व प्रगती समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामाचे आदेश रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट उल्लेख निविदेमध्ये असल्याने तसेच कोणत्याही नुकसानीस रायगड पाटबंधारे विभागाचे कोलाड येथील कार्यकारी अभियंता हे कार्यालय जबाबदार राहणार नसल्याचा उल्लेख आहे. नेमून दिलेल्या ठिकाणचे गाळाचे परिमाणाचे दि.३१डिसेंबर २०२६ पर्यंत निष्कास करणे संबंधितांवर बंधनकारक असेल. कोणत्याही परिस्थितीत मुदत वाढवून दिली जाणार नाही. असे निविदांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

पोलादपूर तालुक्यातील २१ ठिकाणे आणि महाड तालुक्यातील १ ठिकाणाचा समावेश असूनही ही यादी पोलादपूर तालुका उल्लेखाने रायगड पाटबंधारे विभागाच्या कोलाड येथील कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत तयार करण्यात आली आहे. मंत्री भरतशेठ गोगावले यांनी गेल्यावर्षी पोलादपूर तालुक्यातील शिवसेनेच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिलेल्या शब्दानुसार यावर्षी साडेतीन कोटींचानिधी गाळउपशाद्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रसत्नांसाठी पोलादपूर तालुक्याला मिळाला असून प्रत्येक ठेकेदारांकडून कशाप्रकारे काम सुरू आहे, याबाबत महसूल प्रशासन, शिवसेना कार्यकर्त्यांसह पाटबंधारे विभागकोलाडचेशाखा अभियंता तसेच अनेक सामाजिक संघटनांची बारकाईने नजर असून याकामी 'प्रयत्ने कण वाळूचे रगडिता तेलही गळे'असे प्रयत्न अनेकांकडून स्वबळावर सुरू आहेत.

# उन्हाळी रानमेव्याचा गोडवा, खवय्ये खूश तर ग्रामीण महिलांना रोजगार

**माणगाव : प्रतिनिधी**

उन्हाळा म्हणजे रान फळांची मेजवानी घेऊन येणारा ऋतू असतो. इतर कोणत्याच ऋतूत न मिळणारी फळे,फुले खास या ऋतूत मिळतात. यामध्ये जांभळे,करवंदे,आठुरणी,कोकम इत्यादी फळांचा समावेश असतो. उन्हाळी दिवसात तयार होणारी ही फळे म्हणजे खवय्यांसाठी चविष्ट असा गोडवा असतो.

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर आंबा, काजू इत्यादी फळांवरोबर सर्वसामान्यांच्या आवडीची असलेली खास अशा गोडव्याची फळे म्हणजे जांभळे आणि करवंदे होत. रानाची मैना म्हणून करवंदांच्या उल्लेख केला जातो. कोकणातील डोंगर रांगात दिसणाऱ्या लहान-मोठ्या विस्तीर्ण अशा करवंदाच्या जाळी म्हणजेच विविध पशुपक्ष्यांसाठी निवारा तर असतोच त्याबरोबरीने उन्हाळी दिवसात हिरव्या पानातून डोकावणारी काळाकभिन्न करवंदांची फळे सर्वांनाच आवडतात. पूर्ण पक्व झालेली ही फळे वरून काळकभिन्न असतात व आतून लालसर रंगांचा गर व काही बिया असतात.आंबट-गोड चवीला लागणारी ही करवंदांची फळे म्हणजे खास उन्हाळ्यातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध आहेत. करवंदाची चव फारच न्यारी असते. त्यांपासून सुगरणी चविष्ट चटण्या,लोणची ही तयार करतात. करवंदांच्या उपयोग टोपल्या, सुपाना लेप देण्यासाठी म्हणुन करतात पिकलेली करवंदे वाळवून पुढील दिवसांसाठी खाण्यासाठी ठेवली जातात.सुकलेल्या या करवंदांचा स्वाद व चव अगदी वेगळाच स्वादिष्ट असतो.

करवंद प्रमाणे डोंगर भागात जांभळीची झाडे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. उन्हाळी दिवसात तयार होणारे तुरट गोड चवीची फळे खायला चविष्ट असतात. जांभळाचे आयुर्वेदात असंख्य उपयोग सांगितले आहेत. जांभळे मधुमेहींसाठी खास औषधी म्हणून आहेत. हाडकी, मांसवाली , मनुकांच्या आकाराची तर काही टपोरी असणारी जांभळे खवय्यांसाठी पर्वणी असते. उन्हाळी दिवसात तयार होणाऱ्या या जांभळांना चांगली मागणी असून २०० ते २५० रुपये किलोप्रमाणे ती विकली जातात. करवंदे,जांभूळ बरोबरच लालचुटुक रंगांनी मन वेधून घेणारी कोकमाची फळे ही या ऋतूमध्ये तयार होतात. आमसूल, सरबत तयार करण्यासाठी उपयुक्त असलेली ही फळे गृहिणींच्या खास आवडीचे असतात. आयुर्वेदातही या फळांचे अनेक उपयोग, गुणधर्म सांगितले आहेत. २०० ते ३०० रुपये किलो प्रमाणे ही फळे विकली जातात. करवंदे,जांभळे,कोकम या बरोबरच आठूरणी, मंदुकली इत्यादी लहान-मोठी फळे खवय्यांसाठी पर्वणी असते. या रांमेव्याव्याच्या विक्रीतून ग्रामीण भागातील अनेक महिलांना हक्काचा रोजगार मिळतो .करवंदे १० ते २० रूपये वाटा विकला जातो.पळसाच्या पानात करवंदाची विक्री केली जाते.रान मेव्यानी भरलेला करवंदाचा द्रोण दिसायला सुंदर व आकर्षक असतो.कोकम ५० ते १०० रुपये किलोने विकला जातो. जांभळे २५० ते ३०० रुपये प्रति किलो दराने विकली जातात. इतर फळेही रानावनात झाडी झुडपात मिळतात.उन्हाळ्यातील रान मेव्याचा हा गोडवा खवय्यांच्या पसंतीचा असून याची चव वर्षभर मनात रेंगाळत राहते.उन्हाळा ऋतू संपत असताना पुढील काही दिवसांत रानमेव्याचा आनंद भरभरून घेतला जाईल. वटपौर्णिमेच्या निमीत्ताने ही रान मेव्याला चांगली मागणी असते सुवासिनी वाणात आवर्जून या रान फळांनी वाण सजवितात.रान फळांचा हा हंगाम खास वटपौर्णिमे पर्यंत सुरू राहतो.त्यानंतर मात्र रान फळांचा हंगाम निघून जातो. रान फळांना विशिष्ठ गोडवा असतो. हा गोडवा खास उन्हाळी दिवसात चाखायला मिळतो कोकणात खास करून वैशिष्ठ्य पूर्ण असलेली रान फळे आहारात उपयुक्त असून आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. यांच्या विक्रीतून ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळतो.गृहिणी रान मेव्यातून विविध पदार्थ तयार करतात.

## भारतीय हवाई दलात ओंकार चोरघे यांची ऐतिहासिक कामगिरी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील आपटवणे गावचा सुपुत्र कु. ओंकार शरद चोरघे याची भारतीय हवाईदलामध्ये Airman (Medical Assistant) पदासाठी संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




ओंकारच्या या यशामुळे सुधागड तालुक्याचा गौरव वाढला असून गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. भारतीय हवाईदलात वैद्यकीय सहाय्यक पदावर प्रथम क्रमांकाने निवड होणे ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

त्याच्या पुढील सेवाकार्यासाठी आणि उज्वल भविष्यासाठी संपूर्ण सुधागड तालुका तसेच रायगड जिल्ह्यातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# चेन्नईचा आयपीएलमधील सर्वात मोठा पराभव

## गुजरातचा दमदार विजय; टॉप २मध्ये स्थान निश्चित

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधील ६६ व्या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्सचा ८९ धावांनी पराभव करत त्यांचा स्पर्धेतील प्रवास संपवला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरातने दिलेल्या २३० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईचा डाव १४० धावांवर आटोपला. चेन्नईचा हा धावांच्या बाबतीत या हंगामातील सर्वात मोठा पराभव ठरला आहे.

गुजरात टायटन्स संघाविरुद्ध झालेल्या पराभवासह चेन्नई सुपर किंग्सचा आयपीएल २०२६ स्पर्धेतील प्रवास इथेच संपला आहे. स्पर्धेतील ६६ वा सामना चेन्नई सुपर किंग्स आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करताना ४ गडी बाद २२९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्स संघाचा डाव १४० धावांवर आटोपला. यासह गुजरात टायटन्सने हा सामना ८९ धावांनी आपल्या नावावर केला.

चेन्नई सुपर किंग्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २३० धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करायचा होता. इतक्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईला चांगल्या सुरुवातीची गरज होती. पण तशी सुरुवात मिळू शकली नाही. सलामीवीर फलंदाज संजू सॅमसन गोल्डन डकवर बाद



झाला. त्यानंतर मॅट शॉर्ट २४ धावांवर बाद झाला. कर्णधार ऋतुराज गायकवाडकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण तो अवघ्या १६ धावांवर माघारी परतला. मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना उर्विल पटेलकडूनही मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण तोदेखील शून्यावर माघारी परतला.

कार्तिक शर्माने हातभार लावून १९ धावा केल्या. त्यानंतर शिवम दुबेने अवघ्या १७ चेंडूत ४७ धावांची खेळी करून सामना खेचून आणायचा प्रयत्न केला. पण त्याला रशीद खानने झेलबाद करत माघारी धाडलं. त्यानंतर अंशूल कंबोजने १९ धावांची खेळी केली. पण चेन्नईचा संपूर्ण डाव १४० धावांवर आटोपला. चेन्नईने हा सामना ८९ धावांनी गमावला.

# बीसीसीआयने रणजी ट्रॉफीच बंद करावी

## दिलीप वेंगसरकर यांचा संताप

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ नंतर अफगाणिस्तानविरूद्ध होणाऱ्या वनडे आणि कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये गुरनूर ब्रारसह ३ नव्या खेळाडूंना संधी दिली आहे, पण यामध्ये रणजी ट्रॉफीत ६० विकेट्स घेत जम्मू काश्मीरला पहिलं रणजी जेतेपद पटकावून देण्यात मोठी भूमिका बजावणाऱ्या आकिब नबीची मात्र निवड करण्यात आली नाही. हे पाहून निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर व निवड समितीवर टीका केली जात आहे. आता भारताचे माजी खेळाडू दिलीप वेंगसरकरदेखील संतापले आहेत.



माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकरदेखील आकिब नबीला संघात न घेतल्याने संतापले आहेत. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी संघ निवडताना जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीवर जोरदार टीका केली आहे.

आकिब नबीने २०२५-२६ रणजी ट्रॉफी हंगामात अफलातून कामगिरी करत १० सामन्यांत १२.५६ च्या जबरदस्त सरासरीने तब्बल ६० विकेट्स घेतल्या आणि स्पर्धेतील सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. जम्मू-काश्मीरला पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी विजेतेपद मिळवून देण्यात त्याची मोठी भूमिका होती. या शानदार कामगिरीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने गौरवण्यात आले.

निवड समितीने त्याच्याकडे दुर्लक्ष करणं हास्यास्पद आहे. हे अजिबात मान्य करता येणार नाही. हा सरळ अन्याय आहे, अशा संतप्त शब्दांत माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी प्रतिक्रिया दिली.

# कॉनर कॅरोलचा वर्ल्ड रेकॉर्ड; टी-२०मध्ये अनोखी कामगिरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या सर्वांच्या नजरा आयपीएल २०२६ वर खिळल्या आहेत. आयपीएलचा यंदाचा हंगाम आता अखेरच्या टप्प्यात पोहोचला आहे. ३ प्लेऑफचे संघ निश्चित झालेले असताना आता अखेरच्या स्थानासाठी ४ संघांमध्ये लढत सुरू आहे. यादरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक नवा विश्वविक्रम घडला आहे. २३ वर्षीय फलंदाज कॉनर कॅरोल याने हा विक्रम रचला आहे.

क्रोएशिया संघाचा सलामीवीर कॉनर कॅरोलने पुन्हा तुफानी फलंदाजी करत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. अवघ्या २३ वर्षांच्या डावखुऱ्या फलंदाजाने आपल्या



कारकिर्दीतील पहिल्या तीन टी-२० आंतरराष्ट्रीय डावांमध्ये तब्बल २९५ धावा करत नवा इतिहास घडवला. याआधी हा विक्रम फ्रान्सच्या गुस्ताव मॅककिऑनच्या नावावर होता. त्याने पहिल्या तीन डावांत २८६ धावा केल्या होत्या, मात्र कॅरोलने तिसऱ्या सामन्यात ७४ धावांची खेळी करत हा विक्रम मोडीत काढला.

टी-२० विश्वचषक युरोप पात्रता स्पर्धेत फ्रान्सविरुद्धच्या सामन्यात कॅरोलने क्रोएशियासाठी पदार्पण केले. २०९ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना संपूर्ण संघ अपयशी ठरला, पण कॅरोलने एकहाती झुंज दिली. त्याने अवघ्या ३४ चेंडूंत ७१ धावांची स्फोटक खेळी केली. विशेष म्हणजे या सामन्यात त्याच्यानंतर संघातील खेळाडूची सर्वोच्च धावसंख्या १२ धावा होती. त्यामुळे कॅरोलची ही खेळी संघासाठी महत्त्वाची ठरली.

स्वित्झर्लंडविरुद्धच्या सामन्यातही कॉनर कॅरोलने आपला वादळी फॉर्म कायम ठेवला. त्याने अवघ्या ७२ चेंडूंत तब्बल १५० धावांची धडाकेबाज खेळी केली. या खेळीत त्याने १० षटकार आणि १३ चौकार लगावले. क्रोएशियाच्या उर्वरित चार फलंदाजांनी मिळून फक्त ४१ धावा केल्या. यासह संघाची धावसंख्या २ बाद ११९ धावा अशी होती.

# प्लेऑफमधील स्थानासाठी चार टीममध्ये 'काँटे की टक्कर'

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचा प्रवास संपला आहे. गट फेरीतील आपला शेवटचा सामना गुजरात टायटन्सकडून गमावल्यामुळे हा संघ स्पर्धेतून बाहेर पडला. लखनऊ सुपर जायंट्स आणि मुंबई इंडियन्सनंतर सीएसके प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा तिसरा संघ ठरला आहे. आरसीबी, हैदराबाद आणि गुजरात टायटन्स आधीच प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. पंजाब किंग्स, कोलकाता नाइट रायडर्स, राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहेत.

पहिल्या सात सामन्यांनंतर पंजाब किंग्सकडे १३ गुण होते. उर्वरित १३ सामन्यांनंतरही त्यांचे १३ गुण कायम आहेत. त्यांना आपला शेवटचा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागेल. याव्यतिरिक्त राजस्थान आपला शेवटचा सामना हरावा



अशी आपण आशा केली पाहिजे. जरी केकेआरने आपला शेवटचा सामना जिंकला तरी, त्यांच्या आघाडीचे अंतर कमी झाले पाहिजे. केकेआरला आपल्या पहिल्या सहा सामन्यांमध्ये एकही विजय मिळवता आला नाही. त्यानंतरच्या सात सामन्यांपैकी सहा सामने जिंकल्यामुळे संघाचे १३ गुण झाले आहेत. या हंगामातील शेवटच्या गट सामन्यात ते दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळतील. संघाने हा सामना जिंकलाच पाहिजे आणि राजस्थान रॉयल्स मुंबईकडून हरावा अशी आशा केली पाहिजे. जरी पंजाब किंग्सने लखनऊविरुद्ध विजय मिळवला तरी आघाडीचे अंतर कमीच राहील.

दिल्ली कॅपिटल्सचा नेट रनरेट -०.८७१ आहे. संघाने आपल्या शेवटच्या सामन्यात केकेआरला मोठ्या फरकाने हरवलेच पाहिजे. शिवाय पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स आपले शेवटचे सामने हरावेत अशी आशा केली पाहिजे. प्लेऑफचा निर्णय २४ मे रोजी ठरणार आहे. कारण आता संपूर्ण खेळ राजस्थान रॉयल्सवर अवलंबून असणार आहे. जरी उर्वरित तीन संघ पंजाब किंग्स, कोलकाता नाइट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स त्यांचे शेवटचे सामने जिंकले तरीही २४ मेपर्यंत त्यांच्या प्लेऑफमधील जागा निश्चित होणार नाहीत.

# गोलरक्षक मॅन्युएल नॉयरचे पुनरागमन

## 'फिफा' विश्वचषकासाठी जर्मनी संघाची घोषणा



**जर्मनी : वृत्तसंस्था**

जर्मनीचा अनुभवी गोलरक्षक मॅन्युएल नॉयरने प्रशिक्षक ज्युलियन नागेल्समन यांच्या विनंतीनंतर निवृत्ती मागे घेत आगामी फिफा विश्वचषक संघासाठी पुनरागमन केले आहे. ४० वर्षीय नॉयरने २०२४ युरो अजिंक्यपद स्पर्धेनंतर निवृत्ती घेतली होती. मात्र, त्याला आता कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिकेत होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेसाठी जर्मनीच्या २६ सदस्यीय संघात स्थान मिळाले आहे.

बार्सिलोनाचा गोलरक्षक मार्क-आंद्रे टेर स्टेगन याला नॉयरचा उत्तराधिकारी मानले जात होते, परंतु गेल्या काही काळापासून तो दुखापतींनी त्रस्त आहे. जानेवारीमध्ये बार्सिलोनाकडून गिरोना क्लबमध्ये (लोनवर) दाखल झाल्यापासून तो केवळ दोनच सामने खेळला आहे. अन्य एक गोलरक्षक ऑलिव्हर बाऊमनने जर्मनीसाठी ११ सामने खेळताना चांगली कामगिरी केली. आता नॉयरचे पुनरागमन हा त्याच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. नॉयरला १२४ आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. २०१४ मधील विश्वविजेत्या जर्मनी संघाचा तो प्रमुख सदस्य होता. त्याची सर्वकालीन सर्वोत्तम गोलरक्षकांमध्ये गणना केली जाते.

# चेन्नईसाठी दुष्काळात तेरावा महिना

## ■ बीसीसीआयकडून संपूर्ण संघावर कारवाई



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सकडून झालेल्या मानहानीकारक पराभवामुळे चेन्नई सुपर किंग्सचा आयपीएल २०२६ मधील प्रवास संपुष्टात आला आहे. या पराभवातून संपूर्ण चेन्नई संघ अजून सावरलेला नसतानाच त्यांना आणखी एक धक्का बसला आहे. चेन्नईसाठी दुष्काळात तेरावा महिन्यासारखी गत झाली आहे. सामना गमावताच संघावर बीसीसीआयकडून कारवाई झाली आहे.

गुजरातविरुद्धच्या सामन्यानंतर स्लो ओव्हर टाकल्याबद्दल दोषी आढळल्याने बीसीसीआयने कर्णधारासह संपूर्ण चेन्नई संघाला मोठा दंड ठोठावला आहे. या हंगामात चेन्नई संघाने ही चूक करण्याची ही दुसरी वेळ आहे, ज्यामुळे त्यांना मोठा दंड ठोठावण्यात आला आहे. यापूर्वी हंगामातील १८ व्या सामन्यात संघ निर्धारित षटके टाकण्यात अपयशी ठरला होता. यावेळी आचारसंहितेच्या नियम २.२२ अंतर्गत जो किमान षटकांच्या गतीशी संबंधित आहे, कर्णधार गायकवाडला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. केवळ कर्णधारावरच नव्हे, तर संघातील इतर सर्व खेळाडूंवर, ज्यात महत्त्वपूर्ण खेळाडूंचाही समावेश आहे कारवाई करण्यात आली आहे. त्या सर्वांना ६ लाख रुपये किंवा त्यांच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

# वरुण चक्रवर्तीचे वॉटसनकडून कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाइट रायडर्सचा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती डाव्या पायाला हेअरलाइन फ्रॅक्चर झाले असतानाही वेदना सहन करीत अप्रतिम गोलंदाजी करीत आहे. डाव्या पायाच्या दुखापतीमुळे होणाऱ्या वेदना सहन करीत खेळणारा फिरकीपटू वरुण चक्रवर्तीचे कोलकाता नाइट रायडर्स संघाचा सहाय्यक प्रशिक्षक शेन वॉटसनने विशेष कौतुक केले आहे. कोलकाता संघाला प्लेऑफमध्ये पोहचवण्यासाठी तो प्रचंड जिद्दीने खेळत असून त्याची तळमळ प्रेरणादायी असल्याचे वॉटसन म्हणाला. दोन आठवड्यांपूर्वी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना वरुणच्या पायाला दुखापत झाली होती.

# शुबमन गिलकडून गुजरातच्या फॅन्सचा अपमान

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२६ मध्ये गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्सचा ८९ धावांनी धुव्वा उडवला. यामुळे चेन्नई आयपीएल २०२६ मधून बाहेर पडले व गुजरातने गुणतालिकेत आपले स्थान मजबूत केले. गुजरातच्या विजयात साई सुदर्शनने ८४ धावा केल्या, तर कर्णधार शुबमन गिलनेही ६४ धावा केल्या, पण यानंतरही गिल ट्रोल होत आहे.

शुबमन गिलने चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध शिवम दुबेचा एक शानदार झेल घेतला. दुबे गुजरातविरुद्ध उत्कृष्ट फलंदाजी करत होता. त्याने १६ चेंडूंमध्ये चार षटकार आणि चार चौकार मारले होते. मात्र, ११ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर दुबेने रशीद खानच्या गोलंदाजीवर एक मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू बॅटला नीट लागला नाही व कव्हर्स एरियात उभा असलेला कर्णधार गिल मागे धावला. गिलने मागे धावत असताना झेप घेतली आणि दुबेचा एक अप्रतिम झेल घेतला. झेल घेतल्यानंतर गिल आक्रमकपणे जल्लोष करताना दिसला. गिलने तोंडावर बोट ठेवत क्राऊडला शांत राहा असे सेलिब्रेशन केले, पण हा सामना अहमदाबादमध्ये होता. त्यामुळे गिलने गुजरातसाठी चिअर्स करायला आलेल्याच क्राउडला शांत केल्याने आता त्याच्यावर टीका होत आहे.

# प्लेऑफच्या उंबरठ्यावर रंगला थरार | अंतिम सामन्यासाठी ३१ मेची प्रतीक्षा

आयपीएल २०२६ चा महामुकाबला आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. २८ मार्च रोजी दणक्यात सुरू झालेल्या क्रिकेटच्या या कार्निव्हलची ३१ मे रोजी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या भव्य अंतिम सामन्याने सांगता होईल. १० संघ, ८४ सामने आणि दररोज बदलणारी समीकरणे यामुळे यंदाचा हंगाम विशेष गाजत आहे.

गुणतालिकेवर नजर टाकली तर गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १३ सामन्यांत ९ विजयांसह १८ गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे. त्यांच्या मागे गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद प्रत्येकी १६ गुणांसह प्लेऑफच्या शर्यतीत मजबूत आहेत. पंजाब किंग्जने १३ गुणांसह चौथे स्थान कायम ठेवत सगळ्यांनाच चकित केले आहे.

दुसरीकडे पाच वेळा चषक उंचावणारी चेन्नई सुपर किंग्ज मात्र ६ विजयांसह सहाव्या स्थानी रेंगाळत आता तर प्लेऑफच्या शर्यतीतूनही बाहेर पडली आहे. मुंबई इंडियन्सची अवस्था तर अधिकच खराब आहे. या हंगामाचा खरा हिरो ठरला आहे राजस्थान रॉयल्सचा १४ वर्षांचा वादळी फलंदाज वैभव सूर्यवंशी. त्याने १३ सामन्यांत ५७९ धावा कुटून ऑरेंज कॅपवर आपले नाव कोरले आहे. गुजरातविरुद्ध ३८ चेंडूंत ठोकलेले शतक आणि १०१ धावांची खेळी हा तर या हंगामातील सर्वात मोठा चर्चेचा विषय ठरला. गोलंदाजीत आरसीबीचा अनुभवी भुवनेश्वर कुमार २४ बळींसह पर्पल कॅपचा मानकरी आहे.

२६ मेपासून प्लेऑफचे रणशिंग





फुंकले जाणार आहे. क्वालिफायर-१, एलिमिनेटर आणि क्वालिफायर-२ नंतर कोणते दोन संघ ३१ मे रोजी अंतिम सामन्यात भिडणार याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. आता यापुढे होणाऱ्या प्रत्येक लढतीनंतर गुणतालिकेचे सगळे गणित बदलू शकते. आयपीएलने एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली आहे की इथे फक्त मोठी नावे नाही तर मैदानावरची कामगिरी बोलते. तरुण खेळाडूंचा आत्मविश्वास, शेवटच्या चेंडूपर्यंतचा थरार आणि अनपेक्षित निकाल हेच या हंगामाचे खरे सौंदर्य ठरत आहे.

यंदाचा हंगाम केवळ आकड्यांचा खेळ राहिला नाही. तो नव्या पिढीच्या जिद्दीचा, अनुभवाच्या कसोटीचा आणि चाहत्यांच्या धडधडत्या हृदयाचा बनला आहे. वैभव सूर्यवंशीच्या बॅटमधून निघणारे षटकार असोत, भुवीच्या चेंडूवर उडणारे त्रिफळे असोत किंवा विराट-रजतच्या जोडीने जिंकलेली जवळची लढत असो प्रत्येक क्षणाने प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवले. आता प्रश्न फक्त एकच उरतो की चिन्नास्वामीच्या लाल समुद्रात आरसीबी घरच्या मैदानावर सलग दुसरे विजेतेपद पटकावणार की गुजरात-हैदराबादसारखा प्रबळ दावेदार त्यांचा हिरमोड करणार? पंजाब किंग्जचा 'अंडरडॉग' प्रवास फायनलपर्यंत पोहचणार का? उत्तरासाठी फक्त काही दिवसांची प्रतीक्षा आहे. ३१ मेच्या रात्री एका संघाचे स्वप्न पूर्ण होणार, तर दुसऱ्याच्या पदरी पुन्हा संघर्ष, पण तोपर्यंत प्रत्येक षटक, प्रत्येक विकेट आणि प्रत्येक धाव चाहत्यांसाठी सण ठरणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com